



# ।। ज्योतिर्मय ।।

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १६७ वा ❑ भारतीय सौर दिनांक २४ श्रावण शके १९४८, शनिवार दि.१५ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ८ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## डिजिटल युगाचे स्वातंत्र्यवीर: तंत्रज्ञानातून राष्ट्रनिर्मितीकडे

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर करून राष्ट्रनिर्मितीला गती देणारे देशातील तरुण संशोधक, जबाबदार नागरिक, वैज्ञानिक आणि आयटी तज्ञ हेच आजचे स्वातंत्र्यवीर आहेत. पारंपारिक सीमांच्या पलीकडे जाऊन सॉफ्टवेअर, सायबर सुरक्षा आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या बळावर देशाचे आ''र्थिक व सार्वभौमत्व टिकवणारे हे नवे शिलेदार महत्त्वाचे आहेत. डिजिटल इंडिया आणि तंत्रज्ञानाच्या युगात तरुणांची देशाप्रती असणारी जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. आजचा तरुण केवळ तंत्रज्ञानाचा वापरकर्ता नसून तो देशाच्या प्रगतीचा मुख्य चालक आहे. या डिजिटल युगात तरुणांनी आपली जबाबदारी पार पाडताना स्वातंत्र्य वीरांनी जे स्वप्न बघितले त्या स्वप्नांची पूर्तता करण्याची मोठी जबाबदारी या देशातील तरुणांच्या खांद्यावर आहे.**

डिजिटल इंडियाच्या युगात तंत्रज्ञान आणि सोशल मीडियामुळे तरुणांच्या हातात अमर्याद शक्ती आली आहे. देशाचा विकास आणि समाज प्रगतीसाठी या साधनांचा सकारात्मक वापर करणे, सायबर सुरक्षेचे भान राखणे आणि फेक न्यूजपासून समाज सुरक्षित ठेवणे ही आजच्या तरुण पिढीची देशाप्रती असलेली सर्वोच्च जबाबदारी आहे.

डिजिटल युगात तरुणांची कोणती भूमिका व कर्तव्ये पार पडावी तर शिक्षणाचा प्रसार, नावीन्यपूर्ण स्टार्टअप्स आणि कौशल्य विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर तरुणांनी करायला पाहिजे.भारताच्या प्रगतीसाठी तरुणांनी शिक्षणाचा विस्तार, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि स्टार्टअप्सच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात आणणे गरजेचे आहे. या तिन्ही घटकांमुळे देशाची अर्थव्यवस्था बळकट होते आणि तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी मिळतात.दर्जेदार शिक्षण प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.डिजिटल साधनांमुळे शिक्षणातील अंतर कमी होत आहे. ज्ञानाच्या प्रसाराने समाज अधिक सक्षम बनतो.कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानरोजगाराभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनचा वापर वाढला पाहिजे.

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादकता आणि कार्यक्षमता सुधारते.नावीन्यपूर्ण स्टार्टअप्सतरुणांनी नोकरी शोधण्यापेक्षा नोकरी देणारे (उद्योजक) व्हावे.स्थानिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या आधारे नवीन उपाय शोधावेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्टार्टअप्सची उभारणी करावी. देशातील युवकांनी ग्रामीण भागात डिजिटल साधनांचे मोफत प्रशिक्षण देऊ शकतात. यासाठीऑनलाईन संसाधने वापरता येतील. स्वयम किंवा दीक्षा (सारख्या सरकारी प्लॅटफॉर्मचा प्रचार करणे, गरीब विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य शैक्षणिक व्हिडिओ आणि नोट्स तयार करणे,करिअर समुपदेशन करून ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणे,नावीन्यपूर्ण स्टार्टअप्स ,स्थानिक समस्यांवर उपाय शोधणे जसे की शेती, आरोग्य आणि वाहतूक या क्षेत्रांतील स्थानिक प्रश्नांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने स्टार्टअप सुरू करणे.मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणे,परदेशी उत्पादनांना पर्याय म्हणून भारतातच दर्जेदार तंत्रज्ञान विकसित करणे, स्वतः नोकरी शोधण्याऐवजी स्टार्टअप्सच्या माध्यमातून इतरांना नोकऱ्या देणे,डिजिटल पेमेंट आणि शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान (उदा. ड्रोन, एआय) पुरवणारे स्टार्टअप्स उभारणे, एआय कोडिंग, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी यांसारखी आधुनिक कौशल्ये आत्मसात करणे. डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करणे, स्किल इंडिया डिजिटल पोर्टलचा वापर करून स्वतःचे आणि इतरांचे कौशल्य वाढवणे. पारंपरिक कारागीर आणि कामगारांना आधुनिक




डिजिटल टूल्स वापरण्याचे प्रशिक्षण देणे.केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता प्रॅक्टिकल आणि प्रोजेक्ट-बेस्ड लर्निंगवर लक्ष केंद्रित करणे.या माध्यमातून तरुणांनी देशाच्या विकासासाठी योगदान दिले पाहिजे.

फेक न्यूजला आळा घालणे आजच्या डिजिटल युगात तरुणांची मोठी जबाबदारी आहे. कोणतीही माहिती किंवा सोशल मीडियावरील मेसेज पडताळल्याशिवाय पुढे पाठवू नये.

फेक न्यूजला (बनावट बातम्या) आळा घालणे ही आजच्या डिजिटल युगात तरुणांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. तरुण पिढी सोशल मीडियाचा सर्वाधिक वापर करते. त्यामुळे एखादी खोटी बातमी किंवा अफवा पसरण्यापूर्वी ती रोखण्याचे सामर्थ्य आणि माध्यम साक्षरता तरुणांकडे आहे. समाजात तणाव निर्माण करणाऱ्या किंवा दिशाभूल करणाऱ्या बातम्या ओळखणे आणि न पुढे पाठवणे हे समाजहितासाठी आवश्यक आहे.

कोणतीही बातमी, व्हिडिओ किंवा मेसेज फॉरवर्ड करण्यापूर्वी त्याची सत्यता पडताळून पाहणे.सजगता बाळगणे, भावना उत्तेजित करणाऱ्या किंवा शंकास्पद माहितीवर लगेच विश्वास न ठेवणे,लोकांमध्ये प्रबोधन करणे, आपल्या परिसरातील आणि कुटुंबातील सदस्यांना फेक न्यूजच्या धोक्याबद्दल व सायबर सुरक्षिततेबद्दल जागरूक करणे.अधिकृत स्रोतांचा वापर करणे, खात्रीशीर आणि अधिकृत वृत्तसंस्थांच्या माहितीचाच आधार घेणे. अशा विविध भूमिका देशहित व समाजाच्या हितासाठी स्वतंत्र भारताच्या विकासासाठी तरुणांनी करायला पाहिजे.

सायबर सुरक्षा ही आजच्या डिजिटल युगात केवळ एक तांत्रिक गरज नसून ती देशाची सुव्यवस्था आणि आपली वैयक्तिक गोपनीयता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

देशाची डिजिटल सुव्यवस्था आणि स्वतःची गोपनीयता सुरक्षित ठेवण्यासाठी जागरूक राहणे तरुणांसाठी आवश्यक आहे.सायबर सुरक्षा म्हणजे डिजिटल जगतात स्वतःची माहिती आणि संगणक सुरक्षित ठेवणे. देशाची डिजिटल व्यवस्था आणि वैयक्तिक गोपनीयता जपण्यासाठी जागरूक राहणे, मजबूत पासवर्ड वापरणे आणि ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहणे गरजेचे आहे.

देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि विकासात्मक उपक्रमांना बळ देण्यासाठी ऑनलाईन व्यासपीठांचा प्रभावी वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डिजिटल माध्यमांद्वारे आपण विचार, मूल्ये आणि सकारात्मक संदेश लोकांपर्यंत पोहोचवू शकतो.यासाठी काय करता येईल तर ,सोशल मीडियावर राष्ट्रप्रेम आणि एकता वाढवणारे विचार शेअर करणे,सलोखा वाढवणे,विविध जाती व धर्मांच्या लोकांमध्ये संवाद साधून प्रेमाचा संदेश पसरवणे,विकास चर्चा घडवून आणले ,शासकीय योजना आणि विकासात्मक कामांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे.




सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे वेळेचा अपव्यय होतो, व्यसन जडते आणि मानसिक आरोग्यावर गंभीर ताण येतो. सतत स्क्रोलिंग केल्याने लक्ष विचलित होते, एकाग्रता कमी होते, झोपेच्या तक्रारी वाढतात आणि नैराश्य किंवा एकटेपणाची भावना निर्माण होऊ शकते. यासाठी देशातील तरुणांनी स्वतः तर सावध राहिलेच पाहिजे मात्र इतराना देखील याबाबतीत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला पाहिजे.

डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता द्वारे पसरवली जाणारी चुकीची माहिती आणि दिशाभूल रोखण्याची जबाबदारी तरुणांची आहे.डीफेक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे होणारी चुकीची माहिती रोखण्याची मोठी जबाबदारी तरुणांवर आहे. तरुणांनी सोशल मीडियावर कोणतीही माहिती खात्री केल्याशिवाय पुढे पाठवू नये. त्यांनी डिजिटल साक्षरता वाढवून आणि फॅक्ट-चेक टूल्सचा वापर करून खोट्या बातम्या ओळखायला शिकले पाहिजे. यामुळे समाज सुरक्षित राहील.

कोणतीही पोस्ट किंवा व्हिडिओ शेअर करण्यापूर्वी मूळ स्रोताची माहिती घ्यावी. संशयास्पद माहिती खरी आहे का ते तपासण्यासाठी विश्वासू फॅक्ट-चेक साईट्सचा वापर करावा.जागरूकता वाढवावी .मित्र आणि कुटुंबाला एआयच्या धोक्यांविषयी व डीपफेकबद्दल सांगा अंधश्रद्धा टाळा. खळबळजनक मथळे पाहून लगेच विश्वास ठेवू नका.

देशाच्या सुरक्षिततेला आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण होईल अशा कृती टाळावी.देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी कायद्याचे कठोर भान असणे आणि देशविरोधी किंवा हिंसक कृतींपासून दूर राहणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. भारतीय कायद्यानुसार देशाच्या अखंडतेला धोका पोहोचवणाऱ्या कृत्यांवर कडक प्रतिबंध आणि शिक्षेची तरतूद आहे.

देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या किंवा सर्वसामान्यांमध्ये दहशत पसरवणाऱ्या कृत्यांवर नवीन कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाते. देशाचे सार्वभौमत्व आणि सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अधिकार सरकारकडे आहेत.सायबर सुरक्षेला आणि देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या डिजिटल गुन्ह्यांसाठी गंभीर शिक्षेची तरतूद आहे.यासाठी जनतेला मार्गदर्शन करण्याची व स्वतः कायद्याचे पालन देशातील प्रत्येक नागरिकांनी व तरुणांनी केले पाहिजे.

देशाच्या विरोधात जाणारी कोणतीही कृती किंवा हिंसाचाराला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी टाळाव्यात. सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांवर अफवा पसरवण्यापासून किंवा राष्ट्रीय सुरक्षेला बाधक ठरणारी माहिती सामायिक करण्यापासून दूर राहावे.संविधानाचा व देशाच्या कायद्याचा सन्मान करून सामाजिक सलोखा टिकवून ठेवावा.

## तेजपुंज स्वातंत्र्य सूर्याचा सोनेरी प्रकाश, सर्वांगीण विकास आणि प्रगतीची घोडदौड

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

प्राचीन वैदिक वाङ्मयातून भारताला बहुरत्नांनी वसुंधरा असे म्हटले आहे कारण गंगेचा प्रवाह जसा अखंडपणे वाहतो आहे आणि वाळूच्या कणा बरोबरच सोन्याचे कण मागे ठेवतो आहे त्याप्रमाणे गेल्या पाच हजार वर्षात एक समर्थ राष्ट्र म्हणून भारताने आपल्या इतिहासाचा प्रवाह तेजस्वीपणे जोपासला आहे द वंडर दॅट वॉज इंडिया या ग्रंथात ए एल बाशम म्हणतात भारतीय संस्कृती ही स्थिर नसून ती सतत गतिमान आणि परिवर्तनीय राहिली आहे त्यातच या संस्कृतीचे खरे श्रेष्ठत्व प्रकट होते ईश्वर हा हिरा असून ब्रह्मा विष्णू आणि महेश हे त्याचे तेजस्वी अलंकार आहेत नव्या जगात भारत जगाला काय देऊ शकणार आहे तर संस्कृती आणि संस्कृती मूल्य प्रेरणा आणि आता कृत्रिम प्रज्ञाचे बळ सुद्धा एखाद्या संजीवनी प्रमाणे जगाला अर्पण करण्यास भारत सज्ज झाला आहे.

भूत वर्तमान आणि भविष्य यांच्यातील प्रवाही चैतन्य म्हणजे आधुनिक भारताचा इतिहास होय. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा अनंत अडचणीतून मार्ग काढत देशाला आज भव्य प्रगतीचे शिखर गाठणे शक्य झाले आहे. तेजपुंज स्वातंत्र्य सूर्याच्या सोनेरी प्रकाशात सारा देश न्हाऊन निघत आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे १९४७ ते २०२६ या सात दशकांच्या वाटचालीनंतर देशाने विकासाने प्रगतीची नवी घोडदौड अनुभवली आहे.

ज्या शहीद आणि हुतात्म्याने देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले बलिदान आणि समर्पणाने देशाच्या प्रगतीचे स्वप्न पाहिले त्यांची ती स्वप्ने आज साकार होताना दिसत आहेत.

भारताच्या सर्वांगीण प्रगतीचे सिंहावलोकन करताना आपणास अंतर्मुख होऊन विचार करावा लागतो कारण पहिल्या सहा दशकांच्या तुलनेत मागील दशकात म्हणजे २०१४ ते २०२६ या बारा वर्षातील अखंड तपश्चर्यानंतर देश जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे.

कृषी उद्योग शिक्षण विज्ञान तंत्रज्ञान अंतराळ संशोधन आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा अशा कितीतरी क्षेत्रात देशाने यशाचे शिखर गाठले आहे.

मागील दशकामध्ये सामाजिक आर्थिक प्रगतीचे एक नवे मन्वंतर घडून आले आहे २५ कोटी लोक दारिद्र रेषेच्या बाहेर पडले असून एक नवा मध्यमवर्ग लोकशाहीच्या रक्षणासाठी पुढे सरसावला आहे.

दारिद्र्यरेषेखाली असलेल्या लक्षावधी लोकांना सुखी आणि समाधानी जीवन जगण्यासाठी त्यांच्या अन्न वस्त्र निवारा शिक्षण या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग या न्यायाने समर्पित भावनेने प्रयत्न केले जात आहेत.


ऐतिहासिक वाटचाल

स्वातंत्र्योत्तर भारताच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीची ऐतिहासिक वाटचाल कशी झाली ते लक्षात घेण्यासारखे आहे

१९४७ ते १९९० हा प्राथमिक प्रारंभिक पाया मजबूत करणारा आणि अनेक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी गती देणारा कालखंड होता होता या काळात देशाने सुरक्षा आणि समृद्धीकडे वाटचाल केली ब्रिटिश काळातील अराजक व अनागोंदीमुळे वारसाने मिळालेले गरिबीचे प्रश्न आणि अन्नधान्यावरील अवलंबित्व या सर्व जटील समस्यावर मात करत १९६० च्या दशकात लालबहादूर शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पहिल्या हरितक्रांतीमुळे देश अन्न सुरक्षित पर्यंत पोहोचला

विज्ञान आणि तंत्रज्ञानात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भक्कम प्रगतीचा पाया घातला होता सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम अवजड उद्योग क्षेत्रातील प्रगती पंचवार्षिक आर्थिक नियोजनाच्या आधारे हाती घेण्यात आलेले उपक्रम तसेच लघु उद्योगांचा विकास यामुळे प्रगतीचा नवा टप्पा गाठणे शक्य झाले आर्थिक प्रगती बरोबर या काळात सामाजिक प्रगती घडून आली पोलादी महिला पंतप्रधान इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली भारताने पाकिस्तानचा पराभव करून बांगलादेश मुक्त केला तसेच या काळात साक्षरतेचे प्रमाण वाढले आणि सरासरी आयुष्यमान सुद्धा वृद्धिंगत झाले आरोग्यसेवा सुधारणा झाल्या सामाजिक वनीकरणात नवे प्रकल्प हाती घेण्यात आले नोकरशाही आणि लाल फितीचा कारभार यावर या काळात मात करण्यात आली.

१९९१ ते २०१३ हा एक महत्वपूर्ण टप्पा होता आणि या काळात आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेला अधिक गती देण्यात आली १९९१ च्या आर्थिक उदारीकरणामुळे पी व्ही नरसिंहराव यांच्या दूरदृष्टीमुळे व्यापार खुला झाला परवाना राजवटीला पूर्णविराम मिळाला नियंत्रणे कमी झाली आणि परदेशी गुंतवणुकीचे स्वागत करण्यात आले गंभीर आर्थिक संकटावर मात करून जागतिक व्यापार वृद्धीला नव्या दिशा प्राप्त झाल्या माहिती तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रातील नव्या तेजीमुळे अर्थव्यवस्था अधिक मजबूत होऊ लागली भारताचा उदय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सॉफ्टवेअर कॅपिटल म्हणून झाला एक मोठा महत्त्वाकांक्षी शहरी मध्यमवर्ग हळूहळू उदयास येऊ लागला आणि तोच लोकशाहीचा खरा रक्षक आधारस्तंभ बनला डॉक्टर मनमोहन सिंग यांनी त्यांच्या कारकिर्दीत आर्थिक सुधारणांचा वेग कायम ठेवला आणि लोकांची क्रयशक्ती वाढत गेली त्याबरोबर देश मोठ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करू लागला २०१४ ते २०२६ हा कालखंड तर नरेंद्र भाई मोदी यांच्या





अष्टपैलू नेतृत्वाखालील सर्वांगीण प्रगतीचा नवा उच्चांक बिंदू ठरला पायाभूत सुविधांमध्ये देशाने मोठी गरुड झेप घेतली राष्ट्रीय महामार्गांचे मोठे जाळे विकसित करण्यात आले नितीन गडकरी यांच्या सजग प्रयत्नामुळे देशभरात १.४६ लाख किलोमीटर एवढा राष्ट्रीय महामार्गांचा टप्पा गाठण्यात आला भारत जगातील दुसरा महत्त्वाचा पक्के रस्ते असलेला देश बनला आणि अर्थव्यवस्थेत सुद्धा तेवढेच नवचैतन्य आले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक परिश्रमातून देशात डिजिटल क्रांती घडून आली एकीकडे पेमेंट प्रणाली म्हणजे यु पी आय मुळे भारताच्या या सामर्थ्याची प्रचिती साऱ्या जगाने घेतली जगातील आज तीस देशांमध्ये भारतीय पेमेंट प्रणाली लोकप्रिय ठरली आहे डिजिटल ओळखपत्र असो की मतदानाचे कार्ड असो आरोग्य सेवा असो की गोरगरीब शेतकऱ्यांच्या खात्यावर मिळणारे नियमित आर्थिक सहाय्य असो त्यामुळे वेगवान सामाजिक प्रगतीचा नवा टप्पा गाठला गेला स्वातंत्र्यानंतर प्रथमच सामाजिक वार्षिक समावेशन घडून आले वीस कोटी पेक्षा अधिक लोकांच्या जनधन अकाउंट मुळे ग्रामीण भागातील शेकडो गरीब लोक प्रथमच बँकेत आपले खाते उघडू शकले या कालखंडात क्रांतिकारक नवे शैक्षणिक धोरण कृतीमध्ये आले प्रगत माहिती तंत्रज्ञान अंतराळ संशोधन सेमीकंडक्टर क्षेत्रातील मोठी गरुड झेप तसेच कॉन्टम कॉम्प्युटिंग यासारख्या क्षेत्रातील नवे संकल्प यामुळे देश नव्या

शिखरापर्यंत पोहोचला गगनयान चंद्रयान आणि सूर्य संशोधन या क्षेत्रातील प्रगती पाहून जग थक्क झाले भारताने चंद्राच्या दक्षिण किनाऱ्यावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे अमेरिकेच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेने इसरोच्या मदतीने जगातील हवामानाच्या वादळाच्या अंदाजाबाबत वेध घेणारा नवा उपग्रह अंतराळात सोडला आहे आणि तो उभ्या मानव जातीच्या कल्याणासाठी सिद्ध झाला आहे.

मोदी युगातील आर्थिक आघाडीवरील प्रगती ही तर इतिहासातील एक नवे सोनेरी पान ठरली आहे.

पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या अथक परिश्रमामुळे कृषी उद्योग आणि शिक्षण या क्षेत्रातील क्रांतिकारक प्रगतीमुळे भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था बनला आहे स्वदेशी आत्मनिर्भर भारत आणि स्टार्ट अप इंडिया मेक इन इंडियाया मोहिमांचे हे फलित आहे




बेटी बचाव बेटी पढाव मुळे शाळा व महाविद्यालयातील तसेच विद्यापीठातील विद्यार्थिनींचे प्रमाण वाढत आहे ड्रोन दीदी आणि लक्ष्मी दीदी यासारख्या योजनामुळे महिलांचे सक्षमीकरण गतीने होत आहे

जनधन योजनेमुळे भारत जगाच्या आर्थिक नकाशावर आला आहे.

चौथी अर्थव्यवस्था

१९४७ मध्ये सुमारे ३० अब्ज डॉलर्स जीडीपी असलेल्या एका नाजूक युद्धग्रस्त कृषिप्रधान राष्ट्रापासून ऐतिहासिक संपन्न वाटचाल करत देशाने कृषी आत्मनिर्भरता डिजिटल क्रांती आणि अंतराळ संशोधन प्रगत माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा यासारख्या क्षेत्रात विक्रमी प्रगतीचा टप्पा गाठला आहे चार ट्रिलियन डॉलर पेक्षा जास्त ताकतीने अर्थव्यवस्थेने प्रभावी क्षमता असलेल्या स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर देशांमध्ये रूपांतर केले आहे

आज देश चार ट्रिलियन डॉलर्स पेक्षा जास्त जीडीपी असलेला जगातील प्रमुख जागतिक अर्थव्यवस्थेत समाविष्ट झाला आहे

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या सर्वांगीण प्रगतीचे दर्शन आपणास पुढील काही मौलिक पैलूंच्या आधारे घडविण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

आर्थिक आणि औद्योगिक आघाडीवर

स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक वाटचालीत गेले दशक आणि क्रांतिकारक ठरले आहे अधिक प्रमाणात नवे वळण देणारे ठरले कारण या काळात देशाच्या जीडीपी मध्ये झालेली वाढ क्रांतिकारक आहे अमेरिका आणि चीन यांच्या तुलनेत भारताचा जीडीपी ७.१% व त्यापेक्षा जास्त झाला आहे

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताची ही वाटचाल सामान्य जनतेच्या अशा आकांक्षा उंचावणारी ठरली आहे देश जन्माला आला तेव्हा नगण्य आर्थिक वाढ दिसत होती पण स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या सात दशकात चित्र झपाट्याने बदलले देशाचा आर्थिक विकास होईल ७.१ % पेक्षा जास्त आहे आणि अर्थव्यवस्था नाजूक पातळीवरून ४.१ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचली आहे स्वातंत्र्योत्तर काळातील नगण्य व दुर्लक्षित पातळीपासून आता अर्थव्यवस्था ४.१ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचली आहे ही काही जादूची कांडी नाही हा काही चमत्कार नाही हे फलित आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी उद्योग शिक्षण अशा सर्व आघाड्यावर जी जोरदार मुसंडी मारली त्याचे हे खऱ्या अर्थाने फलित म्हटले पाहिजे.

आर्थिक उदारीकरणाची फळे

१९९१ यावर्षी तेव्हा ते पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांच्या दूरदृष्टीने युक्त अशा कुशल नेतृत्वामुळे भारतामध्ये उदारीकरण खाजगीकरण आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली.

बंद बाजारपेठेचे जुने समाजवादी मॉडेल बदलले आणि खुल्या व मुक्त अर्थव्यवस्थेमुळे व्यापक आर्थिक सुधारणांना नवी गती मिळाली त्यामुळे भारताच्या आर्थिक संधी वाढल्या जागतिक व्यापारामध्ये भारताला नवे मानाचे स्थान प्राप्त झाले . कृषी क्षेत्रातील स्वयंपूर्णता उद्योगातील आधुनिकता आणि शिक्षणातील अध्ययवत संशोधन यामुळे अर्थव्यवस्थेला नवी संजीवनी प्राप्त झाली.

विज्ञान तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनात देशाने एक नवी झेप घेतली

खाजगी उद्योग समूहांचा उदय झाला टाटा आणि बिर्ला यांच्याप्रमाणेच बजाज अडाणी अंबानी यांच्यासारख्या नव्या उद्योजकांनी गगनाला स्पर्श करणारी प्रगतीची शिखरे गाठली जगाच्या अनेक देशातील बंदरांचा विकास असो की तेथील विमानतळांची उभारणी असो किंवा तेथील रेल्वे मार्गांचे रुंदीकरण असो या सर्व बाबतीत भारतीयांनी पुढाकार घेतला. भारतीय खाजगी उद्योग आणि सार्वजनिक उपक्रमांना जगभरात प्रतिष्ठा प्राप्त झाली



# जात्यावरच्या ओव्या......


भरला बाजार
सगळीकड घमघमाट
शेव चिवडा जिलेबी
पापडी भेळ तिखट ||७९७||

भरला बाजार
साखर, तेल, घासलेट
जसा सरल बुधवार
पुन्हा तिच फरपट ||७९८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६१

ज्योतिर्मय साहित्य




श्रद्धावान लभते ज्ञानम! श्रद्धावंतालाच ज्ञान प्राप्त होते. अर्थात हे ज्ञान म्हणजे परमेश्वर प्राप्तीचे ज्ञान किंवा स्व स्वरूपाचे ज्ञान. परंतु त्यासाठी संयम, विवेक आणि वैराग्य या गुणांची आवश्यकता असते. सामान्य माणसाजवळ एवढा धीर नसतो. म्हणून त्याने जी काही दोन चार पावले परमेश्वर प्राप्तीच्या मार्गावर टाकलेली असतात, तिथून तो मागे येतो. सद्गुरूंनी मला अमुक इतका जप करायला सांगितला होता. तेवढ्या संख्येमध्ये मी तो केला परंतु मला कोणताही अनुभव आला नाही किंवा परमेश्वराची प्राप्ती झाली नाही. असा विचार करून सामान्य माणूस अध्यात्ममार्गापासून ढळतो. पण ज्याची श्रद्धा अविचल असते, तो कितीही संकटे आली किंवा कितीही तपश्चर्या करावी लागली तरी त्यापासून ढळत नाही. जर त्याला कोणी सांगितले की तू एवढा जप केलास परंतु तेवढा पुरेसा नाही. तुला आणखी इतकाच जप करावा लागेल किंवा आणखी अमुक इतकी वर्षे तपश्चर्या करावी लागेल तर तो त्यासाठी आनंदाने तयार होतो. कारण त्याला माहिती असते की त्यानंतर परमेश्वर आपल्याला निश्चितपणे भेटेल. आणि अशा रीतीने ज्यांची श्रद्धा अविचल असते अशा लोकांना परमेश्वराची प्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही.



म्हणून आपण संतसंगतीचा लाभ घ्यावा. त्यांच्याकडून परमेश्वर प्राप्तीचे रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. आणि त्यांच्याशी निरर्थक वाद न घालता त्यांच्या सांगण्याप्रमाणे वाटचाल करावी. वेळीच सावध होणे गरजेचे आहे हेच समर्थ या ठिकाणी आपल्याला सांगू इच्छितात. तेव्हा निजध्यास सोडू नका. संत सोहिरोबा म्हणतात, '' हरी भजनावीण काळ घालवू नको रे. ''

स्वसंवाद : १. निजध्यास केव्हा आणि का तुटतो ?

२. कीर्तन-प्रवचनानंतर वाटणारी तीव्र भक्तिभावना काही दिवसांत का ओसरते? यावर उपाय काय?

३. ''श्रद्धावान लभते ज्ञानम्'' या वचनावर तुमचा दृढ विश्वास आहे का?

४. सद्गुरूंनी सांगितलेला जप केला पण अनुभव आला नाही. अशा वेळी मनात कोणते विचार येतात? तुम्ही त्याला कसे सामोरे जाता ?

५. संत सोहिरोबांची ओळ ''हरी भजनावीण काळ घालवू नको रे'' हे मला माझ्या व्यस्त आयुष्यात कसे साधता येईल?

(क्रमशः)



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏



॥ संजय उवाच... ॥


@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ अनुभूती

अनुभूती ही "विचार, अनुभव आणि इंद्रियांद्वारे ज्ञान आणि समज प्राप्त करण्याची मानसिक क्रिया किंवा प्रक्रिया" आहे, आपल्या विचारांची अनुभूती इतरांना येत असते, म्हणून आचार विचार शुद्धच पाहिजेत.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

'मी नाही, तू आहेस ' हे जाणणे हीच खरी भक्ती होय. भक्तीचा विषय एक भगवंत ठेवला, की बाकी सर्वांचा विसर पडतो. भक्ती केली की चित्त निर्विषय होते, हे सांगावेच लागत नाही. स्वत:चे विस्मरण आणि भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य. भगवंताची प्राप्ती पाहिजे असेल तर भक्ती करावी. भगवंताच्या चरित्रात भक्तांच्या सर्व तऱ्हा आहेत. त्यामध्ये आपण कुठे तरी खासच बसू ! भगवंताने त्या सर्वांना समाधान दिले, मग ते आपल्याला का मिळणार नाही ? जग प्रगतिपर आहे हे खरे; पण पैसा, मुले, मान्यता वगैरे ऐहिक सुखांची वाढ होणे यालाच आपण प्रगती समजतो. भगवंताची भक्ती ही खरी प्रगती होय. ही प्रगती बाहेर दिसण्यासारखी नाही. भगवंतावाचून यश हे अपयशच समजावे. कित्येक वेळा अपयश हेच यश बनते; म्हणून अपयश आले तरी, ते भगवंताच्या इच्छेने आले असे समजून शांत राहावे. 'भगवंत आहे ' असे म्हणणे किंवा मानणे याचा अर्थ असा की, ही सर्व सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे. त्या सृष्टीचे तो रक्षण आणि पालन करतो. सृष्टीमध्ये अनेक समूह आहेत, त्यांचेसुद्धा रक्षण आणि पालन तोच करतो. त्या समूहांपैकी आपण एक जीव आहोत, आणि आपलेही रक्षण आणि पालन तो सदा करीत आहे.

खरे पाहिले असता प्रत्येक मनुष्य अद्वैताचाच अभ्यास करीत असतो. अद्वैतामध्ये नेणारे द्वैत आपल्याला पाहिजे आहे. भगवंत, म्हणजे सगुण परमात्मा, असा आहे की तो वेगळा दिसतो खरा, परंतु भक्ताला तो आपल्यासारखा करून घेतो. आई आणि मुलगा यांच्यामध्ये साम्य असते. मुलाचा आवाज आईला नेहमी गोडच लागतो, त्याप्रमाणे भक्ताचा आवाज भगवंताला गोड लागतो. शेताची राखण करण्याकरिता जसे काठीवर कांबळे घालून त्याचे सोंग करतात, तसेच सगुण उपासनेचे आहे. राखणदार हजर नसताना ते सोंग ज्याप्रमाणे शेताचे रक्षण करायला उपयोगी पडते, त्याचप्रमाणे निर्गुणाच्या अभावी परमात्म्याची आठवण करून देण्यासाठी सगुण हे उपयोगी पडते. डोंगराच्या माथ्यावर चढल्याशिवाय आपले पलीकडे असलेले गाव जसे आपल्याला दिसत नाही, तसे सगुणरूपमय झाल्याशिवाय निर्गुण होता येत नाही.

जो भगवंतावर अवलंबून आहे तोच खरा स्वतंत्र होय. भगवंताचा ध्यास लागणे म्हणजे तद्रूपच होणे होय. भगवंताची प्रीती याचेच नाव भक्ती. ' माझा त्राता, माझी काळजी घेणारा, माझे रक्षण करणारा आणि पालन करणारा तो भगवंत आहे ' असे मानणे आणि तसे वागणे हीच भगवंताबद्दलची खरी अस्तित्वबुद्धी होय. आपले स्वत:वर जितके प्रेम आहे, त्याच्यापेक्षा जास्त प्रेम भगवंतावर करणे हीच खरी उपासना, आणि हेच जीवनाचे सर्वस्व होय.

संकटांचे डोंगर अंगावर पडले तरी ज्याची वृत्ती भगवंतापासून वळत नाही, तोच खरा भगवंताचा झाला.

***

# ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

पुढे.....
हीच कथा ज्यावेळेस भगवान श्रीकृष्ण गोकुळात नंदाच्या घरी वाढत होते त्यावेळेस देवकीला अशा प्रसंगी आपल्या मुलाची आठवण येई व डोळ्यात आसवे आणून ती त्या दिव्यांना ओवाळताना अतित कोण हा प्रश्न विचारी. आणि सर्वांतर्यामी असणारे भगवान आपल्या बाल रुपात मातेच्या पाठीमागून खांद्यावर हात ठेवत व म्हणत आई, मीच !

♦गटारी अमावस्या

हल्लीच्या काळात या पवित्र सणाला एक काळी किनार ही लागली आहे. या अमावस्ये नंतर पुढील चार महिने याला चातुर्मास असे म्हणतात या काळात मांस सेवन मदिरा पान इत्यादी पूर्णपणे वर्ज ठेवावे अशी मान्यता आहे. आता उद्यापासून हे निर्बंध पाळावयाचे म्हणून त्याचे आदले दिवशी, या अमावस्येला काही लोक मांस मदिराचे सेवन करून ही गटारी साजरी करतात. या दिवशी इतके मंदिरा पान करतात की, प्रत्यक्ष गटारात जाऊन पडल्याचे ही भान राहू नये. त्यामुळे हल्ली दीप अमावस्या विसरून लोक गटारी अमावस्या म्हणूनच दुर्दैवाने या पवित्र सणाला ओळखू लागले आहेत.

प्रकाशाची दिव्यत्वाची तेजाची आपण पूजा करणारी आपली संस्कृती आहे त्या संस्कृतीचा हा महत्त्वाचा सण आपण त्याच पवित्र भावनेने साजरे करूयात.

*मधुकर बोरीकर*
9403061886




## "भूक, भय आणि भ्रष्टाचार"

मित्रांनो आणि जोतिर्मय वाचकहो, आजच्या शिर्षकातील तिन्ही गोष्टी सार्वत्रिक आहेत. त्यांना आपापले एक खास मूल्य आहे. विशेषत:जीवनावर प्रभावी आहे.मानव स्वतंत्र झाला. व्यवस्थेत तो जगताना जशा"अन्नवस्त्रनिवारा"या गोष्टी आवश्यक आहे.तर अन्न ही आपल्या भूकेशी आवश्यक आहे. आणि या भूक' विषयी आपण पाहू. कारण भय व भ्रष्टाचार वेगवेगळे विषय.. "पण भूक लागली म्हणून खायला मागण्यासाठी भुणभुण लावल्याने त्रस्त झालेल्या असहाय्य मातेने मुलीला जास्त मारहाण केल्याने त्या चिमुरडीने जीव गमावला!"गुजरातमध्ये या घटनेच्या वास्तवाचा चटके पूर्ण समाजाच्या मानसिक वेदनादायी आहे. म्हणून न्यायालयाने समाजासमोरमुद्दा ठेवला, मूलभूत गरजापूर्ण न करता, हतबल व्यक्तीवर गुन्हा कसा? बरोबर ना. पटते का - मित्रांनो, आपल्याला काय वाटते? हा मला वाटते त्या मातेचा पराभव नसून, समाजाचा, नैतिकतेचा, पर्यायाने राजकिय व्यवस्थेचा व सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पराभव आहे. म्हणून ही घटना कुठेतरी बिघडलेल्या घडीकडे लक्ष वेधणारी अशी धोक्याची घंटा आहे, हे आपण आजच समजून घ्यावे. आत एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि स्वस्थ राहा मस्त राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. सुप्रभात.



# लाकडी घाणा तेल खाऊयात निरोगी राहुयात

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

कारण पामतेलाचे उपयोग प्रामुख्याने हा वेगवेगळ्या उद्योगधंद्यांमध्ये केला जातो. असे सांगितले जाते की, हे तेल मलेशिया मध्येही खाण्यास बंदी आहे किंवा वापरले जात नाही. या तेलाच्या पूर्वी भारतामध्ये मोहरीचे किंवा तिळाच्या तेलाचे किंवा खोबरेल तेलाचे उत्पादन चांगलं होत असल्याने याचा वापर आपल्या खाद्य पदार्थमध्ये होत असतो, तसेच हे तेल १००% नैसर्गिक असल्याने लोकांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते.

पण सध्या पामतेल स्वस्त असल्याने भारतीय कंपन्यांना आकर्षित करते आणि म्हणून हे स्वस्तातलं पाम तेलाची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. परिणामी मोहरी आणि तीळ उत्पादन करणाऱ्या शेतकरी वर्गाला याचा मोठा फटका बसला आहे. याशिवाय सर्वात जास्त तोटा हा हे पामतेल खाणाऱ्यांना होत आहे.

काही वर्षपूर्वी हे पामतेल कोणत्याही इतर तेलामध्ये मिक्स करण्यास कायद्याने बंदी होती. मात्र जागतिक स्तरावरून काही करारानुसार भारतावर दबाव वाढवला गेला आणि मग भारताने आधुनिक कायद्यानुसार हे पामतेल इतर तेलामध्ये मिक्स करण्यास परवानगी दिली.

या तेलामध्ये ट्रान्सफॅट्स नावाचा एक घटक असतो. या घटकामध्ये एक प्रकारची अशी चरबी असते की, जी कोणत्याही तापमानाला विरघळत नाही, तुम्ही कितीही व्यायाम केलात तरी ही चरबी कमी होत नाही. ट्रान्सफॅट्स अशाप्रकारे आपल्या शरीरामध्ये साठत राहतात

हळूहळू आपल्या शरीरातील धमण्यामध्ये किंवा रक्त वाहिन्यांमध्ये आणि शरीराच्या इतर भागांमध्ये ही चरबी मोठ्या प्रमाणावर साठते आणि अशावेळी मग हार्ट अटॅक येतो तसेच आपल्याला अर्धांगवायूचा, पक्षाघाताचा झटका येण्याची शक्यता असते. मग यावर उपाय म्हणून लाकडी घाण्याचे शेंगदाणे तेल, करडई तेल, मोहरीच्या किंवा खोबरेल तेल किंवा सूर्यफुलांच्या तेलाचा वापर करण्यास सुरुवात केली पाहिजे.

कारण हे तेल अतिशय घट्ट आणि या तेलाचा साधारपणे वास येत असल्याने, हे तेल आपण खरेदी करत नाही. पण हा जो या खाद्यतेलाचा घट्टपणा आणि चिकटपणा आहे हे तेलाचे काही गुणधर्म आहेत जे आपल्या शरीरावर घातक परिणाम करत नाहीत. म्हणून रोजच्या जेवणात तरल वापरताना ते पूर्ण विचार करून वापरावे जेणेकरून आपल्याला त्याचे वाईट परिणाम होणार नाहीत व आपणच आपलं निरोगी जीवन बरबाद करू शकणार नाही.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

## जयघोष

जयघोष करावा नेहमी
माझ्या भारत देशाचा
उरी वसे अभिमान
माणूसकी अन् आपुलकीसवे
बंधूभावाने वागावे खरे
तिरंगा सर्वांची शान

विठू नामाचा मुखी
रात्रंदिन करावा खरा
जयघोष मनोभावे छान
सावळी माऊली पाहता
तहान भुक हरपते
वारकऱ्यांची भक्ती महान

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भव्य तिरंगा रॅली

## मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करु-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – युवाशक्तीचे नवसंशोधनात मोठे योगदान आहे. त्या सामर्थ्यावर उद्याचा विकसित भारत, विकसित महाराष्ट्र घडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपला देश बलशाली व संपन्न देश म्हणून जगात लौकीक प्राप्त करीत आहे. मराठवाडा सुद्धा सुजलाम सुफलाम करुन दुष्काळमुक्त करु, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.





'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत महात्मा जोतिबा फुले पुतळा संभाजीपेठ ते क्रांती चौक दरम्यान आयोजित भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यात मुख्यमंत्री फडणवीस सहभागी झाले होते. या रॅलीत राज्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इमाव कल्याण मंत्री अतुल सावे, रोहयो व पणन मंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खा. अशोक चव्हाण, खा.स्मिता वाघ, आमदार रवींद्र चव्हाण, आ. प्रशांत बंब, आ. अनुराधा चव्हाण, आ.मंगेश चव्हाण, आ. राम भदाणे तसेच महापौर समीर राजुरकर आदी मान्यवर तसेच उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिवादन केले. त्यानंतर रॅलीस सुरुवात झाली. रॅलीचा समारोप क्रांती चौकात झाला. तेथे उपस्थित जनसमुदायास संबोधित करतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, तिरंगा आमची आन बान आणि शान आहे. ह्या तिरंग्यासाठी हजारो लोकांनी बलिदान दिले. हा तिरंगा हिच आमची खरी ओळख आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी संदेश दिला, ९ ते १५ ऑगस्ट पर्यंत तिरंगा यात्रा काढून देशप्रेमाने ओत प्रोत मातृभुमिचे दर्शन घडवू. त्यानुसार आज हा जनसमुदाय तिरंग्याच्या प्रेमासाठी एकत्र आला आहे.आज छत्रपती संभाजीनगर मध्ये तिरंगा रॅली गर्दीचे रेकॉर्ड तोडले, तिरंग्याचे वादळ मला दिसते आहे, अशा शब्दात त्यांनी छत्रपती संभाजीनगरवासियांचे कौतुक केले.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात गेल्या दशकात देशाला प्रगतीपथावर नेले. जगात बलशाली देश म्हणून ओळख निर्माण झाली, जगात ४ थ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून स्थान निर्माण केलं. आपल्या राज्याची अर्थ व्यवस्था ५० लाख कोटी पर्यंत नेली.

देश बदलतोय, राज्य बदलतंय, मराठवाडाही बदलतोय. आमचा संकल्प आहे मराठावाड्याच्या पुढच्या पुढीला दुष्काळ पाहू देणार नाही. कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी मार्गे मराठवाड्यात आणून इथला भाग सुजलाम सुफलाम करू. आपण तिसरी स्टार्ट अप इको सिस्टीम तयार केली. त्यात तरुणाईचे योगदान मोठे आहे. नव संशोधनात तरुणाई अग्रेसर आहे. त्याबळावरच आपला भारत विकसित भारत म्हणून वाटचाल करीत आहे, असा संदेश त्यांनी दिला.

श्री फडणवीस म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सर्वोत्तम संविधान दिलं. आपल्या हक्का सोबत कर्तव्य लक्षात ठेवावी आणि उत्तम नागरिक बनावे, असे उत्तम नागरिक बनून समाजाची ताकद बना. आपल्या मराठवाड्याला देशापेक्षा १३ महिने उशिरा स्वातंत्र्य मिळालं. निजामच्या राजवतीतून मोकळा श्वास घेण्यासाठी हजारो देशभक्तांनी बलिदान दिलं. त्यांचे स्मरण आपण करू. आज आपण एकप्रतिज्ञा करू. आपल्या देशासाठी, राज्यासाठी समाजासाठी जगू.

सभास्थानी प्रारंभी वंदेमातरम, राज्यगीत झाले व राष्ट्रगीताने सभेचा समारोप झाला. या रॅलीत मोठ्या संख्येने स्वातंत्र्य सैनिक, राजकीय सामाजिक कार्यकर्ते, युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीत सहभागी विविध कलापथक, ढोल लेझीम पथकांनी, संबळ वाद्य पथकांनी लक्ष वेधून घेतले. देशभक्तीपर घोषणांनी रॅली मार्गाचा परिसर दुमदुमून गेला होता.




# प्रकाश सोनवणे यांचा राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते गुरूवारी सेवागौरव

## वंचितांचा ज्ञानदीप या गौरव ग्रंथाचेही प्रकाशन होणार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – ज्ञानसंदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांचा गुरूवारी (२० ऑगस्ट) सकाळी ११ वाजता राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सेवागौरव करण्यात येणार आहे. यावेळी ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते प्रकाश सोनवणे; वंचितांचा ज्ञानदीप या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येईल. शासकीय दूध डेअरी जवळील महसूल प्रबोधिनीच्या सभागृहात आयोजित सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट असतील. जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे आणि मराठवाड्यातील शिक्षक आमदार विक्रम काळे विशेष अतिथी म्हणून उपस्थित असतील. ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे गौरव ग्रंथावर भाष्य करणार आहे. अशोक कांबळे, संदीप सोनवणे, एकनाथ पाखरे आदींनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# राजीव गांधी महाविद्यालयात ग्रंथालय दिवस साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

करमाड – राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे १२ ऑगस्ट २०२६ रोजी. डॉ. एस. आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालय दिवस साजरा करण्यात आला. प्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यानी डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव एस. मुळे हे होते व व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोज देवकर तसेच रा से य अधिकारी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार हे उपस्थित होते.





याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस मुळे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा आढावा घेत, विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची संस्कृती वाढविण्यासाठी अभ्यासासोबतच इतर साहित्य वाचून जिवनात यशस्वी व्हावे याविषयी आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. नरेश डहाळे डॉ. अश्विनी कुमार चिंचोलीकर डॉ. लक्ष्मीकांत दांडगे, डॉ. कालिदास फड, डॉ. जयश्री पाटील, प्रा. नितीन मुळे, सौरभ चव्हाण, अतुल मोरे, अमित राऊत, निखिल साबळे, ललित गोल्डे, नानासाहेब लावंड, योगेश शिंदे, रमेश कचरे, प्रशांत माटे लक्ष्मण खरात, इम्रान पठाण, सुखदेव पोटदुखे, प्रकाश बांगर, रामदास घोडके, तन्मय भावसार, कोठूळे, अर्जुन चव्हाण, गणेश कुऱ्हाडे तसेच प्रसन्न वैद्य, भगवंत देशपांडे, कैलास जाधव, रमेश जाधव, शिवकुमार मुक्तापुरे, अविनाश साळवे, सुनिता पारेकर, अलका कुलकर्णी, मधुकर राठोड व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय समितीचे सभासद, ग्रंथालय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.











महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

'आत्या' : माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा

पुढे.....
वडिलांच्या बहिणीला आपण 'आत्या' म्हणतो. नात्यांच्या व्याख्येत ही माहिती अगदी पुस्तकी आणि बरोबर आहे; पण भावनेच्या कोशात 'आत्या' या शब्दाचा अर्थ एवढाच नसतो.
आत्या घरातील सगळ्या नात्यांना व्यापून उरते. आत्या म्हणजे बाबांच्या माहेरची जिवंत आठवण.
'बाबांचं माहेर?' तुम्ही म्हणाल, "अहो, माहेर आईचं असतं, बहिणीचं असतं; बाबांचं कसं असेल?"
पण मला वाटतं, बाबा लहान असताना ज्या गावी राहिले, ज्या घरात राहिले आणि आई-बाबा आदी ज्या व्यक्तींसोबत राहिले, ते ठिकाण म्हणजे त्यांचं माहेरच!
एखाद्या स्त्रीला आपल्या माहेरची जेवढी ओढ असते, तेवढीच ओढ बाबांनाही त्यांनी बालपण जिथे घालवलं, ज्यांच्यासोबत घालवलं त्या नातेवाईकांची आणि मित्रांची असते.
आणि आत्या म्हणजे बाबांच्या बालपणाची साक्षीदार! एकाच घरात वाढलेले, बरोबर जेवलेले, दंगामस्ती केलेले, छोट्या-मोठ्या कारणांवरून भांडलेले, रुसलेले आणि पुन्हा हसलेले. आपल्या बाबांना 'अरे' म्हणून हक्काने हाक मारणाऱ्या मोजक्या व्यक्तींमधली ती एक! आणि म्हणूनच कदाचित 'आत्या' या नात्यात आपल्या बाबांच्या बालपणाचा एक सुंदर तुकडा दडलेला असतो. (क्रमश:)



कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे


© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

शास्त्र (ज्ञान/विवेक) आणि शस्त्र (शक्ती/संरक्षण) या दोन्ही गोष्टींचे संतुलन हेच कोणत्याही व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या अस्तित्वाचे मूळ कारण असते.शास्त्राशिवाय शस्त्र अंधळे असते: जर केवळ शक्ती असेल पण विवेक नसेल, तर ती शक्ती विनाशाला कारणीभूत ठरते.शस्त्राशिवाय शास्त्र असहाय्य असते: जर केवळ ज्ञान असेल पण स्वतःचे रक्षण करण्याची क्षमता नसेल, तर ते ज्ञान आणि संस्कृती दोन्ही परकीय आक्रमणांसमोर टिकू शकत नाहीत.
आपल्या संस्कृतीने नेहमीच या दोन्हीच्या संतुलनाचा पुरस्कार केला आहे. एका हातात 'शास्त्र' (ग्रंथ/ज्ञान) आणि दुसऱ्या हातात 'शस्त्र' (रक्षणाचे साधन) ही आपल्या देवी-देवतांची रूपे आपल्याला याच गोष्टीची आठवण करून देतात. आत्मरक्षण, आत्मसन्मान आणि विवेकाचा हा संगम आजही तितकाच प्रासंगिक आहे.
ज्या दिवशी आपण शास्त्र आणि शस्त्र दोन्ही एकत्र घेऊन चालू, त्याच दिवशी आपण पुन्हा 'विश्वगुरू'च्या पदावर विराजमान होऊ!

जय जय रघुवीर समर्थ 🙏
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏
अपर्णा परांजपे कात्रज पुणे

विश्व गुरु भारत ..

पुढे....
मनुवाद, ब्राह्मणवाद यांसारख्या संकल्पना विकसित केल्या गेल्या. त्यांच्याच मनात स्वतःच्या शास्त्रांविरुद्ध विष पेरले गेले आणि त्यांना लाज वाटायला लावली; ज्यामुळे ते शास्त्र आणि शस्त्र दोन्ही गमावून विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन उभे ठाकले.



विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

यशासाठी प्रतिभा नव्हे, सातत्य आवश्यक

आपण अनेकदा म्हणतो...
"त्याच्यात जन्मजात टॅलेंट आहे म्हणून तो यशस्वी झाला."
"त्याचा आवाज सुंदर आहे म्हणून तो गायक झाला."
"त्याला अभ्यास पटकन समजतो म्हणून तो हुशार आहे."
"त्याच्यात नैसर्गिक गुणवत्ता आहे म्हणून त्याला यश मिळालं."
पण आपण त्याच्या यशामागची एक गोष्ट अनेकदा पाहत नाही...
त्याने किती वेळा अपयशानंतर पुन्हा सुरुवात केली?
प्रतिभा दिसते... सातत्य दिसत नाही.
एक बीज जमिनीत पेरलं की दुसऱ्या दिवशी त्याचं झाड होत नाही. त्याला रोज पाणी द्यावं लागतं. ऊन सहन करावं लागतं. पावसाचा सामना करावा लागतो. कधी माती घट्ट होते, कधी एखादा किडा त्याला त्रास देतो. तरीही ते बीज जमिनीखाली शांतपणे आपलं काम करत राहतं.
आणि एका दिवशी... ते माती फोडून बाहेर येतं.
यशही असंच असतं.
आपण फक्त झाड पाहतो... पण त्याच्या मुळांनी अंधारात केलेला संघर्ष पाहत नाही.
उत्तर शब्दांनी नाही, वेळेनं द्यायचं असतं.
यश मिळवण्यासाठी नेहमी सर्वात हुशार असण्याची गरज नसते. कधी कधी फक्त एवढंच पुरेसं असतं की, इतरांनी सोडून दिलं तरी आपण सोडायचं नाही.
सातत्य म्हणजे रोज मोठं काम करणं नाही; रोज थोडं का होईना, पण पुढे जाणं होय. कधी परिणाम मिळत नाहीत. कधी कौतुक होत नाही.
कधी आपल्या प्रयत्नांकडे कुणाचं लक्षही जात नाही. अशा वेळीच सातत्याची खरी परीक्षा असते.
कारण लोक तुमच्या यशावर टाळ्या वाजवतील...
पण तुमच्या संघर्षाच्या रात्री तुम्हाला स्वतःलाच जागं राहावं लागतं.
कधी कधी आपल्या आयुष्यात अशीही वेळ येते, जेव्हा आपण थकतो. स्वतःलाच विचारतो—
"मी एवढं करूनही माझं काही होत का नाही?"
तेव्हा लक्षात ठेवा... बीज जमिनीखाली असताना त्याला वाटत असेल का की माझं काहीच होत नाही? नाही.
ते आतून वाढत असतं. तसंच तुमचंही होत असतं.
कदाचित परिणाम अजून दिसत नसतील; पण तुमचे प्रयत्न वाया जात नसतात. म्हणून प्रतिभा कमी आहे म्हणून थांबू नका. संधी कमी मिळते म्हणून थांबू नका. लोक हसतात म्हणून थांबू नका.
एकदा अपयश आलं म्हणून थांबू नका.
कारण इतिहास नेहमी सर्वात प्रतिभावान लोकांनीच घडवला नाही...
तो अनेकदा अशा लोकांनी घडवला, ज्यांनी एकच गोष्ट केली— ते थांबले नाहीत.
"प्रतिभा तुम्हाला सुरुवात करून देऊ शकते; पण सातत्यच तुम्हाला यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जातं." प्रतिभा तुम्हाला गर्दीत वेगळं उभं करू शकते; पण सातत्य तुम्हाला त्या गर्दीतून पुढे घेऊन जातं. म्हणून आज मोठं काही करण्याचा हट्ट करू नका - फक्त कालपेक्षा आज एक पाऊल पुढे टाका. कारण थेंब छोटा असतो, पण तोच सातत्याने पडत राहिला तर दगडालाही झिजवतो. जेव्हा तुम्ही प्रतिभेचा अभाव स्वतःच्या सातत्याने भरून काढाल आणि इतिहास घडवाल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल! हा विजय जगाला तुमचे नाव लक्षात ठेवायला भाग पाडेल. 'प्रतिभा' असणारे अनेक लोक आळसामुळे गाडले जातात, पण 'सातत्य' ठेवणारे सामान्य लोक इतिहासाच्या पानांवर सुवर्णअक्षरांनी लिहिले जातात. स्वतःला कधीच कमी समजू नका, सातत्याचा ध्यास घ्या... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात तुमच्या स्वप्नांना गवसणी घाला!

# भाई संतोख सिंह (१८९३-१९२७) : कैदेच्या आगीतून घडलेला क्रांतिकारक

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

हे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण गदर चळवळीतील अनेक कार्यकर्ते सुरुवातीला केवळ राष्ट्रवादी मुक्तीसाठी झटत होते पण साम्राज्यवाद, भांडवलशाही, वांशिक दडपशाही आणि मजुरांचे शोषण यांचा परस्परसंबंध समजल्यावर त्यांच्यापैकी काही जण समाजवादी विचारांच्या जवळ गेले. संतोख सिंह यांची कैद म्हणून एका विचारपरिवर्तनाची प्रयोगशाळा ठरली.

कारावास हा मनुष्याला मोडून काढण्याचे साधन असते,पण काही जण त्यातून अधिक सुस्पष्ट विचार घेऊन बाहेर येतात. संतोख सिंह यांच्याबाबतत हेच घडले. तुरुंगवासानंतर अमेरिकन सरकारला त्यांना देशाबाहेर हाकलून द्यायचे होते, पण लोकमत आणि दडपणामुळे ते त्वरित शक्य झाले नाही. त्यांच्या कार्याला मोठ्या प्रमाणात जनसमर्थन आणि सहानुभूती होती.

अमेरिकेत संतोख सिंह यांनी गदर पक्षातील अंतर्गत मतभेद सोडवण्याचे कार्य केले. परंतु याच काळात गदर पक्षाने भारतात गट पाठवण्यास सुरुवात केली आणि संतोख सिंह यांनी नोकरी सोडून सियामकडे प्रस्थान केले. सिंगापूर, सियाम आणि बर्मा येथे भारतीय सैनिकांमध्ये बंडाची तयारी सुरू होती, पण ब्रिटिश गुप्तचर यंत्रणा सक्रिय झाली होती आणि अटकसत्र सुरू झाले होते.

सियाममध्ये पोलिसांनी त्यांच्या घरावर छापा टाकला, पण संतोख सिंह यांना आधीच माहिती मिळाल्याने ते जंगलात पळाले. मुसळधार पावसामुळे जंगल पाण्याने भरले होते आणि पोलिसांचा पाठलाग सुरू होता. पळताना ते एका नदीजवळ पोहोचले, जेथे पाणी फुगलेले होते. त्यांना माहित नव्हते की आपण पोहत ही नदी पार करू शकु का?. पण त्यांनी धाडस करून नदी ओलांडली आणि पलीकडे यशस्वीरित्या पोहोचले. पोलिसांनी नदीकाठी येऊन पुढे जावे की नाही यावर विचार चालू असतानाच नदीला जोरदार ओघ आला आणि पोलिसांनी पाठलाग थांबवला. अशा प्रकारे संतोख सिंह जपान आणि नंतर अमेरिकाला पोहोचले.

ही घटना केवळ साहसी नाही; ती पुढे त्यांच्या कारावास आणि संघर्षाच्या संदर्भात त्यांच्या मानसिक धैर्याची सूचक घटना आहे. सततच्या पळापळी, गुप्त जीवन, अटक होण्याची भीती, सीमेवरील चकमकी, आणि तुरुंगातील अनिश्चितता यामुळे व्यक्ती



मानसिकदृष्ट्या खचू शकते; पण संतोख सिंह यांनी अत्यंत कठीण प्रसंगातही धार्मिक श्रद्धा आणि राजकीय निष्ठा पाळल्या.

अफगाणिस्तान आणि भारताकडे

१९२२ मध्ये गदर पक्षाने त्यांना रशिया मार्गे भारतात जाण्याचे निर्देश दिले. अमेरिकन तुरुंगातून बाहेर पडल्यावरही त्यांच्या ध्येयात कुठे ढिलाई आली नाही, याचा हा पुरावा आहे. रशियातून इराण, तेहरान, मशहद, पुढे पायी हरात, गझनीमार्गे काबूल आणि नंतर अफगाणिस्तानातून भारतसीमेपर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत कष्टमय होता.

इराणला जाताना ते तेहरान येथे अटक झाले, पण काही दिवसांत सुटले. तिथून ते मश्हदला गेले आणि तिथून पायी हरात (अफगाणिस्तान) ला पोहोचले. हरातवरून ते गझनी मार्गे काबूलला गेले. हा वाळवंटी मार्ग अत्यंत कठीण होता आणि वाटेत त्यांना कॉलरा झाला. उपाय नसताना त्यांनी पाण्याने आंघोळ करण्याचा धाडसी निर्णय घेतला.नैसर्गिक चमत्काराने ते लगेच बरे झाले आणि काबूलला पोहोचले.

काबूलमध्ये भाई गुरमुख सिंह आणि मास्टर उधम सिंह यांना ते भेटले. हे दोघे लाहोर षडयंत्र खटल्यात जन्मठेपेचे कैदी होते, पण तुरुंगातून पळून काबूलला आले होते. काबूलमधून थोड्या मुक्कामानंतर संतोख सिंह भारताकडे निघाले. अफगाणिस्तानातून पेशावरला जाणाऱ्या नदीवरून मशक (चामड्याची पाण्याची पिशवी) वापरून ते भारतीय सीमेवर पोहोचले, पण तेथे ब्रिटिश पोलिसांनी त्यांना अटक केली. भारतातील ही अटक त्यांच्या आयुष्यातील दुसरा महत्त्वाचा कारावास होता. त्या काळात गुरुद्वारा सुधार लहर (अकाली चळवळ) जोरात होती आणि शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटीचे पहिले जत्थे अटकेत होते. तुरुंगात असताना त्यांनी काही शीर्षस्थ अकाली नेत्यांशी भेट घेतली. त्यांच्या प्रयत्नांमुळे सहा महिन्यांत त्यांची सुटका झाली आणि अडीच वर्षांच्या सदाचरणाच्या हमीवर भाई संतोख सिंह यांना जामीन मिळाला.

ही सहा महिन्यांची कैद कालावधीच्या दृष्टीने अमेरिकेतील दोन वर्षांच्या कैदेपेक्षा लहान असली, तरी तिचे ऐतिहासिक महत्त्व कमी नाही. १९१४-१५ च्या काळात अटक झाली असती तर त्यांना फाशीही होऊ शकली असती. परंतु १९२० च्या दशकात परिस्थिती बदलली होती. गदर चळवळीच्या राजकीय संदर्भात आणि भारतीय सार्वजनिक क्षेत्रातील बदलत्या वातावरणात कारावासाचे स्वरूपही बदलले होते.



✍️ शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

या भारतातील कैदेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिचा त्यांच्या पुढील राजकीय कामावर पडलेला परिणाम. तुरुंगात असताना त्यांचा संपर्क अकाली नेत्यांशी आला, यामुळे शीख धार्मिक-सुधारक आणि राजकीय चळवळींशी त्यांच्या संबंधांचे नवे धागे निर्माण झाले. सुटकेनंतर त्यांनी शांततेत जामिनाचा कालावधी पूर्ण केला परंतु ते निष्क्रिय राहिले नाहीत.

संतोख सिंह यांच्यावर कारावासाचा मनोवैज्ञानिक आणि वैचारिक परिणाम झाला. अमेरिकेतील तुरुंगाने त्यांना समाजवादाची ओळख करून दिली होती. भारतातील अटकेने ब्रिटिश दडपशाहीचे स्वरूप पुन्हा त्यांना अनुभवायला मिळाले. परिणामी, त्यांच्या राष्ट्रवादात वर्गजाणिवेची भर पडली आणि श्रमिक-शेतकरी केंद्रित राजकारणाकडे त्यांचा कल दृढ झाला.

जामिनाचा कालावधी शांततेत संपल्यावर त्यांनी पुन्हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करण्याचा निर्णय घेतला. सर्वप्रथम त्यांनी अमेरिका आणि कॅनडावरून परतलेल्यांना एकत्रित केले आणि त्यांना एकत्र काम करण्यासाठी प्रेरित केले. त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी एक नवीन संघटना स्थापन केली,तिला 'कीर्ति किसान पार्टी' (श्रमिक-शेतकरी पक्ष) असे नाव दिले.

या पक्षाच्या ध्येयांचा प्रचार करण्यासाठी अमृतसर येथून कीर्ति नावाचे मासिक गुरुमुखी भाषेतून सुरू केले. त्याचा पहिला अंक १९२६ मध्ये प्रकाशित झाला. यशस्वीरित्या मासिक काही काळ चालल्यानंतर ते उर्दूतूनही सुरू झाले. हे सर्व संतोख सिंह यांच्या देखरेखीखाली होत होते. या वृत्तपत्रांतून समाजवादाचा प्रचार होत होता आणि पंजाबमधील श्रमिक-शेतकरी वर्गात तो जागर दिसून येतो, त्याचे मुख्य कारण त्यांचे समर्पण होते. समाजवादासोबतच त्यांनी आपल्या धर्मावर पूर्ण श्रद्धा ठेवली होती. कठीण प्रसंगातही त्यांनी गुरु ग्रंथ साहिबची लहान प्रत सोबत ठेवली होती आणि कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी त्यातून हुकमनामा घेतले होते. कीर्ति वृत्तपत्राच्या पहिल्या अंकावरही त्यांनी गुरु ग्रंथ साहिबातून घेतलेला हुकमनामा प्रकाशित केला होता.त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. ते अत्यल्प खात आणि विलासांचा कधीच विचार करत नसत. आहाराकडे दुर्लक्ष झाल्याने आणि तपेदिक (टीबी)झाल्याने त्यांचे आरोग्य बिघडले. वृत्तपत्रे सुरू होऊन थोडाच काळ झाला होता, तेव्हा एप्रिल १९२७ मध्ये त्यांचे निधन झाले. अवघे ३४ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले.

# सुंदर साजिरा श्रावण आला


ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

निसर्गासोबतच श्रावण महिना हा धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा मानला जातो. हा महिना सण आणि उत्सवांची मोठी मालिकाच घेऊन येतो.

श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी जिवतीचे पूजन, आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे.

श्रावणाची सुरुवातच मुळी भक्तीभावाने होते. संपूर्ण महिनाभर घरोघरी आणि मंदिरांमध्ये धार्मिक वातावरणाची निर्मिती होते. या महिन्यात भगवान शिवशंकराची पूजा करण्याचे विशेष महत्त्व आहे. श्रावणी सोमवार हा या महिन्यातील अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी सर्व शिवमंदिरांमध्ये हर हर महादेव आणि बं बम भोलेचा गजर ऐकायला मिळतो. भाविक महादेवाच्या पिंडीवर बेल-फूल वाहतात आणि उपवास करतात. मंदिरांमधून येणारा उदबत्त्यांचा सुगंध आणि घंटानाद संपूर्ण वातावरणात एक अद्भुत सकारात्मक ऊर्जा निर्माण करतो.

फक्त सोमवारच नाही, तर श्रावणातील प्रत्येक वाराला एक वेगळे धार्मिक महत्त्व आहे. मंगळवारी नवविवाहित स्त्रिया आपल्या सौभाग्यासाठी मंगळागौरीची पूजा करतात. संध्याकाळी पारंपरिक खेळ जसे की फुगडी, झिम्मा खेळले जातात, ज्यामुळे घरातील वातावरण आनंदी होते. शुक्रवारी




जिवतीची पूजा आणि वरलक्ष्मी व्रत केले जाते, जे मुलांच्या आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी केले जाते. शनिवारी अश्वत्थ मारुतीची पूजा केली जाते. अशा प्रकारे संपूर्ण महिना उपवास, पूजा अर्चा आणि सात्त्विक आहार यामध्ये व्यतीत होतो. या व्रतांमुळे लोकांमध्ये शिस्त आणि संयम निर्माण होतो.

धार्मिक व्रतांव्यतिरिक्त श्रावणात येणारे सण सामाजिक एकोपा आणि कौटुंबिक जवळीक वाढवणारे असतात. श्रावणातील पहिला मोठा सण म्हणजे नागपंचमी. या दिवशी नागाची पूजा केली जाते आणि शेतकरी आपल्या शेतातील नागदेवतेचे आभार मानतात. निसर्गातील प्रत्येक जीवाला आदर देण्याची ही आपली संस्कृती नागपंचमीच्या माध्यमातून दिसून येते. या दिवशी मुली आणि महिला हातावर मेहंदी काढतात, नवीन कपडे घालतात आणि झाडाला पाळणे बांधून गाणी गातात.

त्यानंतर येतो तो भावा-बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणजेच नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन. कोळी बांधव या दिवशी समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करून आपल्या व्यवसायाची पुन्हा सुरुवात करतात. तर बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची आणि यशाची प्रार्थना करतात, आणि भाऊ तिच्या रक्षणाचे वचन देतो. श्रावणाच्या शेवटी येणारी गोकुळाष्टमी किंवा कृष्णजन्माष्टमी संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. दुसऱ्या दिवशी होणारा दहीहंडीचा उत्सव तर तरुणाईचा आवडता सण असतो. ''गोविंदा रे गोपाळा'' च्या गजरात मानवी मनोरे रचून हंडी फोडण्याचा हा थरार श्रावणाची सांगता अत्यंत उत्साहात करतो.

श्रावण महिन्याचे मानवी जीवनावर आणि विशेषतः शेतकऱ्यांवर मोठे ऋण आहे. शेतकरी वर्गासाठी हा महिना अत्यंत समाधानाचा असतो. मृग नक्षत्रात पेरलेली पिके आता शेतात डोलू लागतात. शेतात येणारी हिरवळ पाहून शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमटते. हा महिना कष्टकऱ्यांना विश्रांती आणि येणाऱ्या सुगीच्या दिवसांची आशा देणारा ठरतो. शहरी जीवनातही श्रावण एक आल्हाददायक बदल घेऊन येतो. आठवड्याच्या शेवटी वीकेंडला लोक शहरातून बाहेर पडून लोणावळा, महाबळेश्वर, माळशेज घाट,माथेरान यांसारख्या पर्यटन स्थळांवर निसर्गाचा आनंद घेण्यासाठी गर्दी करतात. निसर्गाच्या सानिध्यात जाऊन ट्रेकिंग करणे किंवा धबधब्याखाली भिजणे हा एक वेगळाच आनंद असतो.

साहित्यात आणि संगीतातही श्रावणाला खूप मोठे स्थान मिळाले आहे. अनेक कवींनी श्रावणाच्या सौंदर्यावर सुंदर कविता आणि गाणी लिहिली आहेत. कवी कुसुमाग्रज, बालकवी आणि ग. दि. माडगूळकर यांच्या लेखणीतून श्रावणाचे विविध रंग उमटले आहेत. श्रावणातील संथ पाऊस, पानांची सळसळ आणि पक्षांचा किलबिलाट निसर्गाचे स्वतःचे एक संगीत तयार करतो.

थोडक्यात सांगायचे तर, आला श्रावण असे म्हणताच मनामध्ये एक वेगळाच उत्साह आणि चैतन्य निर्माण होते. हा महिना आपल्याला निसर्गाच्या जवळ जाण्याची, आपल्या संस्कृतीचे जतन करण्याची आणि कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवण्याची संधी देतो. श्रावण हा केवळ एक महिना नसून ती मनाची एक प्रसन्न अवस्था आहे. तो मानवी जीवनाला पवित्रतेची, मांगल्याची आणि आनंदाची दीक्षा देतो. निसर्गाने नटलेला, सणांनी सजलेला आणि भक्तीने रंगलेला हा श्रावण प्रत्येकाच्या आयुष्यात सुखाची आणि समृद्धीची नवीन पहाट घेऊन येवो.

विशेष...
दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24@gmail.com



# अ. भा. साहित्य संमेलनाची सुरुवात अत्यंत दिमाखदार, अभिमानास्पद


## १०० व्या साहित्य संमेलनाची अतिशय उत्तम सुरुवात

ज्योतिर्मय साहित्य

प्रा. यास्मिन शेख यांचा सन्मान आणि महादेव गोविंद रानडे यांच्या स्मरणाने संमेलनाला झालेली नितांत सुंदर सुरुवात...

महाराष्ट्र साहित्य परिषद संचालित अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजित १०० व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाची सुरुवात अत्यंत दिमाखदार, अभिमानास्पद आणि मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचा गौरव करणाऱ्या वातावरणात झाली. संमेलनाचे हे वेगळेपण...

१८७८ साली पुण्यात भरलेल्या पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे होते. त्या ऐतिहासिक परंपरेचा गौरवपूर्ण वारसा जपत शंभराव्या साहित्य संमेलनाचा प्रारंभ झाला, ही मराठी साहित्यविश्वासाठी अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. भूमी





या ऐतिहासिक प्रसंगी ज्येष्ठ व्याकरण तज्ज्ञ आणि भाषा संशोधक प्रा. यास्मिन शेख (पूर्वाश्रमीच्या जेरुशा जॉन रूबेन) यांचा करण्यात आलेला सन्मान विशेष महत्त्वाचा ठरला. प्राध्यापिका यास्मिन शेख म्हणजे मराठी भाषेचा मानदंड, मराठी भाषेचे भूषण आणि भाषानिष्ठेचे तेजस्वी उदाहरण होय. मराठी भाषेची शिस्त, आणि भाषा अभ्यासासाठी आयुष्य समर्पित करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व खरोखर अनुकरणीय असेच...

व्याकरण आणि भाषाशास्त्र हे ज्यांचे अभ्यासक्षेत्र आहे, त्या प्रा. यास्मिन शेख यांनी मराठी भाषा, प्रमाणलेखन क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान दिले आहे. भाषेसाठी किती निष्ठेने, चिकाटीने आणि साधनेच्या भावनेने कार्य करावे, याचे त्या मूर्तिमंत उदाहरण आहेत.

माझे परमभाग्य असे की, माझ्या 'मागोवा : मराठी प्रमाणलेखनाचा इतिहास' या राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या, ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेल्या ग्रंथाला त्यांनी दीर्घ आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली. त्याचबरोबर ग्रंथाची संहिता, मुद्रिते आणि प्रूफ अत्यंत बारकाईने तपासून दिले. लेखनातील अचूकता, भाषिक शिस्त आणि प्रमाणलेखनाचा आदर्श यासाठी त्यांची ही भूमिका अत्यंत मोलाची ठरली.

जिज्ञासूंनी सुप्रसिद्ध लेखक दिलीप फलटणकर आणि कुशल संपादक भानू काळे यांनी संपादित केलेला त्यांचा सुंदर गौरवग्रंथ आवर्जून वाचावा. तसेच श्री. दिलीप फलटणकर यांनी घेतलेली त्यांची दीर्घ मुलाखतही त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणारी आहे.

✍️ डॉ. नागेश अंकुश
(भाषाअभ्यासक)
मो. 94042 88766




मराठी साहित्य महामंडळाच्या शासनमान्य लेखनविषयक नियमांच्या आधारावर प्रा. यास्मिन शेख यांनी निर्माण केलेला संदर्भसंपन्न 'लेखनकोश'हा मराठी भाषा आणि साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण मानदंड ठरला आहे. /ठरत आहे.त्यांच्या दीर्घकालीन संशोधनामुळे मराठी प्रमाणलेखनाला शास्त्रीय अधिष्ठान आणि अधिक भक्कम आधार प्राप्त झाला आहे.

१०० व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने झालेला त्यांचा गौरव हा मराठी भाषा, व्याकरण, प्रमाणलेखन आणि भाषाशास्त्रीय संशोधनाच्या उज्ज्वल परंपरेचा सन्मान आहे. मराठी भाषेच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या या व्रतस्थ, गुरुतुल्य व्यक्तिमत्त्वाचा सन्मान म्हणजे संपूर्ण मराठी भाषिक समाजाचा सन्मान होय.

# युरोप दर्शन

वामन वा. कोठेकर
मोबाईल : +91 98606 99972





## स्वित्झर्लंड

◆ झुरिक

आम्ही स्वित्झर्लंड मध्ये झुरिकला सायंकाळी पोचलो. स्वित्झर्लंड चे निसर्ग सौंदर्य डोळ्यात साठवून ठेवावे असेच आहे. हिरवेगार गालिचे सर्वदूर दिसत होते तर आल्प्स पर्वत रांगा आणि त्यावरील झाडे निसर्गाने स्वित्झर्लंड ला पृथ्वीवरील स्वर्गच बनवले आहे याची साक्ष देत होते. एवढे मनमोहक ते सृष्टी सौंदर्य होते की किती डोळ्यात साठवावे, किती फोटो आणि व्हिडिओ काढावे असे झाले होते. झुरिक ला हॉटेलला रूम चेक इन केले आणि खाली डिनरला गेलो. आमची रहाण्याची आणि जेवणाची उत्तम व्यवस्था विणा वर्ल्ड यांनी प्रत्येक ठिकाणी आगाऊ सूचना देऊन केली होती. परत येऊन दुसरे दिवशीची तयारी केली कारण दुसरे दिवशी आम्ही माउंट टिटलीस बघायला जाणार होतो .

◆ माउंट टिटलीस

आम्ही माउंट टिटलीस येथे जाण्यासाठी निघालो.वर बर्फ असणार आणि साहजिकच प्रचंड थंडी असणार म्हणून आणलेले गरम जॅकेट, कानटोपी सर्व सोबत घेतलेले होते. वर जाण्यासाठी दोन वेगवेगळया टप्प्यात लिफ्ट ने जावे लागते पहिली लिफ्ट ट्रेन सारखी ट्रॅक असलेली आहे तर तिथून पुढे दुसरी मोठी लिफ्ट आहे. यामधून प्रवास करून आम्ही बर्फाछादित माउंट टिटलीस वर पोचलो सगळीकडे बर्फाच आवरण घातलेलं माउंट टिटलीस चे ते रूप पाहून खूप छान वाटत होतं. थोडा स्नो फॉल पण होत होता. गरम जॅकेट कानटोपी घालून सर्वांनी बर्फात खेळण्याचा आनंद लुटला खूप सारे फोटो व्हिडिओ काढले. वरच एक रेस्टॉरंट होते तिथे बर्फात आईस्क्रीम खाण्याचा देखील आनंद घेतला. परत लिफ्टने प्रवास करत खाली आलोत. तिथून झुरिक लेक ला बोट राईड केली आणि सायंकाळी हॉटेलला परत आलो. झुरिक ला आमचे तीन मुक्काम होते. दुसरे दिवशी टॉप ऑफ युरोप उन्गफ्रा येथे जायचे होते.

◆ इंटरलेकन

सर्वजण सकाळी इंटरलेकन शहर बघायला गेलो इथे आपले भारतीय चित्रपट निर्माते व दिग्दर्शक यश चोप्रा यांचा एका बागेत पुतळा आहे. त्यांनी अनेक चित्रपटांचे शूटिंग इकडे केल्यामुळे त्यांचा पुरस्कार देऊन येथे सन्मान करण्यात आला होता.

■ युंगफ्राउजॉख - टॉप ऑफ युरोप

पुढे आम्ही टॉप ऑफ युरोप साठी निघालो. तिकडे जाण्यासाठी ट्रेन होती त्यामधून एका स्टेशन पर्यंत वर जाऊन मग दुसरी ट्रेन पुढे उंगफ्रा या शिखरापर्यंत जाणार होती. त्याप्रमाणे आम्ही ट्रेन मधे बसलो. पुढे ट्रेन बदलून आम्ही टॉप ऑफ युरोप युंगफ्राउजॉख ला वर पोचलो. इथेही सगळीकडे बर्फच दिसत होता. उंगफ्रा ही एक हवामान निरीक्षण ओब्झरवेटरी आहे. वर तिथे आइस फ्लाय मधे बसण्याची आणि आईस वॉकची मजा काही औरच आहे. इथेच दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे या काजोल आणि शाहरुख खानच्या चित्रपटाचे शूटिंग झाले होते त्या ठिकाणी जाण्याचा आणि आपलाही फोटो काढण्याचा मोह आवरला नाही . तेथून परत ट्रेन ने आम्ही खाली आलो आणि हॉटेलला पोचलो.

# पंचमहाभूतांचे महत्त्व आणि ऊर्जा

✍️विभावरी कुलकर्णी मो. 8087810197
मेडिटेशन व हिलिंग मास्टर, समुपदेशक, सांगितोपचारक.




दीपप्रज्वलन किंवा अग्निहोत्रासारख्या पारंपरिक पद्धती.

■ उपयोग: शरीराची चयापचय क्रिया सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि नैराश्य दूर होऊन उत्साह जाणवतो.

◆ ४. वायू तत्त्व (Air Element) वायू तत्त्व हे गती, प्राण आणि विचारांचे प्रतीक आहे.

■ महत्त्व: श्वसनाद्वारे शरीरातील प्रत्येक पेशीला ऑक्सिजन पुरवणे आणि प्राणशक्तीचा प्रवाह चालू ठेवणे हे वायू तत्त्वाचे काम आहे.

■ ऊर्जा मिळवण्याचे मार्ग: मोकळ्या आणि शुद्ध हवेत दीर्घ श्वास घेणे, प्राणायाम (जसे की अनुलोम -विलोम, कपालभाती) नियमित करणे.
निसर्गरम्य ठिकाणी किंवा बागेत वेळ घालवणे.

■ उपयोग: फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते, रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण सुधारते आणि मन एकाग्र होण्यास मदत होते.

◆ ५. आकाश तत्त्व (Space/Ether Element) आकाश तत्त्व हे विस्तार, पोकळी आणि सजगतेचे प्रतीक आहे. इतर सर्व तत्त्वांना सामावून घेण्यासाठी आकाशाची गरज असते.

■ महत्त्व: शरीरातील पोकळी (उदा. कान, नाक, अन्ननलिका आणि पेशींमधील अंतर) आकाश तत्त्वाचे प्रतिनिधित्व करते.

मनाची शांतता आणि आंतरिक जाणीव या तत्त्वावर अवलंबून असते.

■ ऊर्जा मिळवण्याचे मार्ग:
ध्यान (Meditation) आणि मौन पाळणे.
अधूनमधून उपवास (Fasting) करणे, ज्यामुळे शरीरातील अवयवांना विश्रांती मिळते आणि पोकळी निर्माण होते.
शांत ठिकाणी बसून अथांग आकाशाकडे पाहणे.

■ उपयोग : मेंदूचे कार्य सुधारते, सर्जनशीलता वाढते आणि आंतरिक शांती मिळते.

आरोग्यासाठी पंचमहाभूतांचे एकत्रित महत्त्व

आपले शरीर हे या पाच घटकांचेच एक लहान स्वरूप आहे. जेव्हा या घटकांमध्ये असंतुलन निर्माण होते, तेव्हाच आपल्याला आजार किंवा मानसिक तणाव जाणवतो.
निसर्गोपचार (Naturopathy) आणि योगसाधना याद्वारे आपण या पाचही तत्त्वांची ऊर्जा ग्रहण करून स्वतःला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी ठेवू शकतो. निसर्गाच्या जितके जवळ आपण राहू, तितकीच ही ऊर्जा आपल्याला सहज आणि प्रभावीपणे प्राप्त होते. या पंचमहाभूतांकडून ऊर्जा मिळवण्यासाठी वेगळी मेडिटेशन असतात.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात साहित्यिकांचे योगदान

ज्योतिर्मय साहित्य





इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतातील अनेक क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आपले हक्क मिळवण्यासाठी इंग्रजांच्या विरोधात ठिकठिकाणी संघटना उभ्या केल्या. कष्टकरी, कामकरी,शेतमजूर यांनी त्यांना आंदोलनात मदत केली. तसेच रामोशी, गोंड, भिल्ल, संथाळ, कोळी, कोलाम या अनेक आदिवासी जमातींनी इंग्रजांच्या दबावाला बळी न पडता आपले हक्क मिळवण्यासाठी जबरदस्त लढे उभारले. त्याचप्रमाणे भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक नवोदित लेखकांनी, कवींनी, शाहिरांनी आपले प्रभावी लेखन करून आंदोलकाच्या मनात उत्साह निर्माण केला. त्यांच्या लेखनातून लोकांच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण झाली. हे स्वातंत्र्य आपणास हवे असेल तर एकत्रित आल्याशिवाय ते मिळू शकणार नाही.

हे लोकांना कळून चुकले. त्यामुळे त्यांनी स्वातंत्र्यासाठी लेखन असलेले साहित्य वाचन केले. इंग्रजांना त्यामुळे येथून काढता पाय घ्यावा लागला.कारण वाचन कौशल्यामुळे लोकांच्या मनात खरे-खोटे काय आहे. याची जाणीव निर्माण झाली. त्यामुळे वाचक वर्ग वाढला. त्यातून त्यांनी प्रेरणा घेतली.

साने गुरुजींनी आपल्या लेखनातून लोक एकत्रित केले. कलेक्टर कचेरी वर मोर्चे नेले. खरा तो एकची धर्म, बलसागर भारत होवो, तसेच शेतकऱ्यांसाठी देशभक्तीपर गीते गायले. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून चांगला संदेश दिला. त्यामुळे लोकांच्या भावना देश सेवेकडे वळल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत, जनता, समता, मूकनायक या वृत्तपत्रातून लोकांचे सामाजिक, शैक्षणिक प्रबोधन केले.त्यामुळे समाज एक संघ झाला.

लोकमान्य टिळकांनी मराठा व केसरीतून प्रभावी लेखन केले. *सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? राज्य चालविणे म्हणजे सूड घेणे नव्हे. असे जळजळीत लेख लिहिले. त्यामुळे समाजात चैतन्याचे व देशभक्तीचे वारे होऊ लागले.




शाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गवाणकर यांनी आपल्या लेखनीतून, काव्यातून, शाहिरीतून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. मा.बाळासाहेब ठाकरे यांनी स्वातंत्र्यलढ्यात व्यंगचित्र काढून जनआंदोलन व्यापक बनविले. कथा, कविता ,कादंबऱ्या, नाटक या सर्वांमधून लोकांपर्यंत देशभक्तीचा व देश सेवेचा संदेश घराघरात पोहोचला. जातीपातीच्या पलीकडे जाऊन भारतीयांना एकत्रित आणण्याचे महान कार्य साहित्यांनी केले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी साहित्यातून जगाला राष्ट्रवादाचा संदेश दिला. कवी गोविंद यांनी पोवाड्यामधून क्रांतीची धार कायम ठेवली.

हिंदी साहित्यिक भारतेन्दु हरिश्चंद्र व मैथिलीशरण गुप्त यांनी तरुणांमध्ये राष्ट्रीय स्वाभिमान व स्वदेशी वापर करण्याचा महामंत्र दिला. सुभद्रा कुमारी चव्हाण यांनी सातत्याने बंडखोर लेखन केले. त्यांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यावर पोवाडा लिहिला. रामप्रसाद बिस्मिल यांनी *सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है* हे स्वातंत्र्यसंग्रामात प्रसिद्ध देशभक्ती पर गीत लिहून तरुणांमध्ये जोश निर्माण केला. मुन्शी प्रेमचंद यांनी रंगभूमी व कर्मभूमी या कादंबऱ्या तून जनजागृती केली. रामधारी सिंह दिनकर यांनी आपल्या प्रभावी लेखनातून ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. त्यांना विद्रोही कवी म्हणून ओळखले जाते.वीर दामोदर सावरकरांनी त्यांच्या साहित्यातून जनजागृती केली.१८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ त्यांनी लिहिला. तसेच आचार्य अत्रे, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर, जयप्रकाश नारायण अशा अनेक प्रसिद्ध साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून, काव्यातून तरुणांना प्रेरणा दिली. स्वातंत्र्यलढ्यासाठी अशा लेखन केलेल्या अनेक साहित्यिक, कवी, लेखक यांच्या कार्याचा धावता आढावा या ठिकाणी थोडक्यात घेतलेला आहे. त्यामुळे सर्व साहित्यिकांना, कवींना, लेखकांना, नाटककारांना, शाहिरांना स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

***

# माझ्या स्वप्नातील भारत

ज्योतिर्मय साहित्य




स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षात पदार्पण करताना आपला देश पुढील २५ वर्षात कसा असावा? याचा विचार करता काही मुद्दे मांडतो आहे. पुढील काही वर्षात ही प्रगती साध्य व्हावी, अशीच सर्व भारतीयांची ईच्छा असेल, आणि आपला देश विश्वात महासत्ता म्हणून ओळखल्या जावा. आपल्या भारताचा पाया शिक्षण आणि आरोग्यावर उभा असावा. प्रत्येक गावात दर्जेदार शाळा, प्रत्येक तालुक्यात चांगले महाविद्यालय आणि प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक रुग्णालय असावे. शिक्षण हे केवळ पदवीसाठी नसून कौशल्य आणि चारित्र्यासाठी असावे. बालकांची संस्कारमय जडणघडण, मुलींचे शिक्षण, महिला सक्षमीकरण,यावर विशेष प्राधान्य देणारे निर्णय असावेत. आरोग्यसेवा सर्वसामान्यांना परवडणारी आणि सुलभ असावी. ''निरोगी भारत, सुशिक्षित भारत, समृद्ध भारत'' हेच ब्रीदवाक्य असावे. आपला देश हा कृषिप्रधान देश आहे.देशाची अंदाजे ६०% लोकसंख्या अजूनही खेड्यात राहते, गावात राहते. येथूनच विकासाची गती वाढावी. भारतात शेतकरी समृद्ध व्हावा आणि आपला देश आत्महत्यामुक्त व्हावा. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा,शेतमालाला योग्य हमीभाव मिळावा आधुनिक सिंचन,हवामानावर आधारित विमा आणि थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी.

ग्रीन व्हीलेज मध्ये सर्वत्र हिरवेगार होऊन पिकं आनंदाने डोलावीत. घरोघरी प्रसन्न व आनंदी वातावरण असावे. स्मार्ट व्हिलेज योजनेमुळे गावात पक्के रस्ते, २४ तास वीज, स्वच्छ पाणी आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी असेल. तरुण गाव सोडून शहराकडे न जाता गावातच उद्योग करतील, अशी प्रगती व्हावी. स्वच्छ भारत हे केवळ अभियान न राहता जीवनशैली बनावी. नद्या प्रदूषणमुक्त, शहरे प्लास्टिकमुक्त आणि घरे सौरऊर्जेवर चालणारी असावीत. ५, ६, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अंतराळ संशोधनात भारताने जागतिक नेतृत्व करावे. असे कामे व्हावीत की, विश्वातील इतर देशांनी पाहत रहावे. यासोबतच आपला सांस्कृतिक वारसा, मंदिरे, सण-उत्सव यांचे जतनही नक्कीच व्हावे. आधुनिकता आणि अध्यात्म यांचा समन्वय साधून संस्कृती जपत भारताने विश्वात आपली घोडदौड चालू ठेवावी.


गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

सीमा सुरक्षित असेल तरच देश प्रगती करू शकतो. त्यामुळे सर्व सैनिक बांधव पूर्णपणे अत्याधुनिक शस्त्र अस्त्राने सुसज्ज असावीत. त्यांचे वेतन व सुविधा विपुल असाव्यात. देशांतर्गत दहशतवाद, नष्ट झालेला असावा. जात, धर्म, भाषा, प्रांत यापलीकडे जाऊन ''आम्ही सर्वप्रथम भारतीय आहोत'' ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजलेली असावी.

कायदा सर्वांसाठी असावा आणि महिलांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असावी. ''मेक इन इंडिया'' आणि ''स्टार्टअप इंडिया'' च्या माध्यमातून भारत जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनावी. प्रत्येक तरुणाच्या हाताला काम मिळावे. बेरोजगारीचा प्रश्न कायमचा मिटावा.आपल्या देशात कुणी कदापीही उपाशीपोटी झोपण्याची वेळ येऊ नये. भिकारी हा शब्द मराठी शब्दकोषातून हद्दपार व्हावा. भारत केवळ वस्तूंचा आयातदार न राहता जगाला तंत्रज्ञान आणि सेवा देणारा देश बनावा. स्वप्न सरकारचे एकट्याचे नसावे .ते १४० कोटी जनतेचे असावे. मतदान करणे, कर भरणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, पर्यावरण जपणे आणि ''प्रथम राष्ट्र'' ही भावना बाळगणे ही प्रत्येकाची जबाबदारी असावी. माझ्या स्वप्नातील भारत म्हणजे भगतसिंहाचा त्याग, महात्मा गांधींची सत्यनिष्ठा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता आणि स्वामी विवेकानंदांचा आत्मविश्वास यांचा अद्वैत विलक्षण संगम असावा.

असा भारत घडवण्यासाठी आपण सर्वांनी आजपासूनच कामाला लागले पाहिजे. कारण स्वप्न बघणे सोपे आहे, पण ते साकार करण्यासाठी प्रचंड घाम गाळावा लागतो चला, आपण सर्व मिळून तो प्रयत्न करू या आणि

आपल्या देशाला ''विकसित, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारत'' घडवू या. भारत माता की जय! वंदे मातरम्! सर्वांना भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या खूप खूप शुभेच्छा

# स्वातंत्र्य महोत्सव

ज्योतिर्मय साहित्य

१५ ऑगस्ट १९४७ हा प्रत्येक भारतीय नागरीकासाठी अत्यंत महत्वपूर्ण असा खास अभिमानाचा दिवस आहे. कारण हा दिवस पाहण्यासाठी, स्वातंत्र्यात जगण्यासाठी लाखो लोकांनी वर्षानुवर्षे खडतर प्रयत्न केले, बलिदान दिले. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून, अन्याय सहन करत, अत्याचारला बळी पडणाऱ्या जनतेची भारतीयांच्या क्रांतिकारकांच्या प्रयत्नाना यश मिळाले आणि या दिवशी अखेर मुक्तता झाली. बलिदानाचे चीज झाले. आज आपण जे इतक्या मुक्तपणे स्वच्छंद जगत आहोत ते मिळवण्यासाठी कित्येक क्रांतिकारक शाहिद झाले. महात्मा गांधी,जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, भगतसिंग, सावरकर, सुखदेव, आगरकर, लोकमान्य टिळक, राजगुरू, राणी लक्ष्मीबाई कित्ती म्हणून नावे घ्यावीत? अशा सर्वांच्या प्रयत्नांना शेवटी यश आलेच आणि स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी कित्येक चळवळी,मोर्चे, सत्याग्रह करावे लागले, झुंज द्यावी लागली ज्यांनी यासाठी जीवाची सुद्धा परवा केली नाही, त्यांनी त्यांचे कर्तव्य तळमळीने पूर्ण केले, पण त्या मागील त्यांच्या भावनेचे खरच आज चीज होते आहे का?त्यांनी आपल्याला ज्या विश्वासाने आपल्या हातात हा स्वातंत्र्य ध्वज आणून दिला त्यासाठी आपण पात्र आहोत ना, याचा विचार प्रत्येकाने करण्याची आणि त्याप्रमाणे आधी जाणुन घेऊन स्वार्थाचा त्याग करून सर्वांसाठी, समाजाच्या हितासाठी योगदान द्यायलाच हवे. खरंतर स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष सहभागी झालेले असे आज असले तरी अगदीच नगण्य संख्येत असतील कदाचित. त्यांना नक्कीच जाणीव असणारच,पण म्हणतात ना, दुरून डोंगर साजरे असे काहीसे आजच्या आणी भावी पिढीत होण्याची शक्यता जास्त आहे. इतिहास तरी बदलणार नाहीच आता. अशावेळी केवळ इतिहासाचे धडे शिकवून माहिती देण्याबरोबरच आता पुढील त्यांची काय जबाबदारी आहे हे टिकवण्यासाठी याचे शिक्षण देणे जास्त गरजेचे आहे असे वाटते.

भारताच्या स्वातंत्र्याचा आरंभ १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यात झाला. इंग्रजांच्या विरुद्धचा हा सर्वांत मोठ्ठा पहिला सशस्त्र उठाव होता. त्यानंतर अनेक चळवळी,सत्याग्रह झाले. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, छोडो भारत आंदोलन यातून ब्रिटीश राजवटीविरुद्ध जोरदार लढा दिला.

अखेरीस १९४७ मध्ये भारतीय स्वतंत्र कायदामंजूर केलाआणि त्यात भारत आणि पाकिस्तान दोन भागात विभाजन केले. त्यामुळे खूप हानी झाली कित्येकांचे सर्व बाजूंनी प्रचंड नुकसान झाले. हाल अपेष्टाना सामोरे जावे लागले. या स्वातंत्र्यामुळे, विजयामुळे भारतीयांना एक

नवीन उमेद निर्माण झाली. पण भारतीयांच्या समोर अनेक नवीन समस्या, आव्हाने होती. त्या सर्व संकटांवर मात करत देशाल एकसंध आणि मजबूत बनवण्याची गरज होती. सुरुवातीला अनेक छोटी, मोठी संस्थाने होती. त्यांचे विलीनिकरण करणे हे मोठेच आव्हान होते.ते झाल्यानंतर हिंदी राष्ट्रभाषा घोषीत करून जात, वंश, धर्म निरपेक्ष राष्ट्र निर्माण करून देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, कृषी, औद्योगिक शैक्षणिक या सर्व स्तरांवर विशेष लक्ष देऊन कार्य करण्याची नितांत गरज होती. कारण दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक मंदी यामुळे देश ग्रासला होता. पर्यावरणाची हानी झालेली होती त्यामुळे आरोग्य संस्था वाईट झाली होती. त्यात जातीय आणि लिंगभेद, अंतर्गत




संघर्ष, धार्मिक ताण प्रचंड वाढलेला होता.त्यावेळी जवाहर योजनांसारख्या अनेक विकासाच्या योजना, उपक्रम राबवून थोडीतरी अर्थिक प्रगती केली. सर्वासाठी समान कायदा करून समान न्याय, बंधुभाव, समता या तत्वावर लोकशाहीचा कारभार स्थापन केला.सर्वांना मतदानाचा समान अधिकार, समान संधी याद्वारे निर्माण झाली.

राजकीय प्रगतीबरोबरंच भारताने आर्थिक क्षेत्रात सुद्धा प्रगतीचा नवा ठसा उमटवला आहे.

गरुडझेप घेत आज मजबूत पाय रोवून उभे आहे. शेती,उद्योग, माहिती व तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रात ही विशेष लक्ष देऊन खूप प्रगती केली आहे. आपल्याकडील बऱ्याच शेतमाल, फळे, विविध खाद्यपदार्थ, कच्चामाल यांनाही परदेशातून भरपूर मागणी असते. त्याचबरोबर शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातसुद्धा खूपच छान प्रगती आहे. अनेक सोयी,सुविधा,आणि सुधारणा होऊन जीवन, आरोग्य यांचा दर्जा खूप उंचावला आहे. भारतात १९५१ साली रेल्वे सुरु झाली. त्यामुळे दळणवळणाची मोठी सोय झाली. व्यापारवाढ होऊन आर्थिक बाजू अधिक मजबूत झाली.वंदेभारत, शताब्दी अशा अनेक लांब पल्ल्याच्या रेल्वे सुद्धा आज अविरत धावत आहेत. आज भारतीय रेल्वे जगातील मोठी आणि व्यस्त नेटवर्क असलेली आहे. फक्त रेल्वेच नाही तर आपल्या देशात अगदी सायकल पासून ते विमानापर्यंत सर्व वाहने अद्ययावत असून काळानुरुप त्यात बदल करुन मोठ्या प्रमाणात वापरली जातात. विमानतळे सर्व सुविधानी युक्त असून ती अनेक ठिकाणी झालेली असून सोयीस्करपणे जोडलेली असल्यामुळे आता सर्वांना वेळेचे महत्वसुद्धा पटलेले असल्यामुळे पूर्वी केवळ पैसेवालेच विमानाने प्रवास करत असत पण आत मात्र सोय आणी गरज म्हणून याचा खूप मोठ्या प्रमाणात सर्वसाधारण नागरिक सुद्धा सहज सर्रास वापर करत आहेत.यापायाभूत सुविधा अधिक मजबूत होत आहेतच. ३७० कलम हटवून काश्मीरमध्ये असुरक्षितता नष्ट करून शांती आणली. तिथे मोठ्ठे महामार्ग बांधून पर्यटकांची सोय केली. मोठ्ठे पूल सुंदर बांधले. त्यामुळे निसर्गसौन्दर्याचा आस्वाद निर्धास्तपणे आनंदात घेता येऊ लागला आहे.

रामाने श्रीलंकेला जोडणारा सेतू रामायण काळात बांधला होता. आज तिथे आणि असंख्य ठिकाणी समुद्रावर, मोठ्या नद्यांवर त्याहूनही सुंदर आणि विशाल पूल बांधून देशाची सुंदरता वाढवून, मोठ्ठी सोय केली आहे. कुंभमेळ्यांचे उत्तम आयोजन करून एक प्रकारे सांस्कृतिक वारसाही जतन करत आहोत ही सर्वांत मोठी गोष्ट आहे.

आशियातील सर्वांत पहिली अप्सरा अणुभट्टी विकसित करून जगाला सामर्थ्य दाखवून दिले. जगासमोर शक्ती प्रदर्शनासाठी म्हणून चंद्रयान१ हे २००८ साली चंद्रावर सोडण्यात आले. आज भारत सर्वांत मोठी जगातील लोकशाही असलेले राष्ट्र आहे. आज भारत एक विकसित राष्ट्र म्हणून संपूर्ण जगात




ओळखले जाते.

असे असले तरी आपल्याला अजूनही प्रगती करण्यासाठी आर्थिक, सामाजिक, गरीबी , बेरोजगारी, सामाजिक विषमता, अशा अनेक बाबतीत लक्ष देणे गरजेचे आहे.भारतातील विविधतेतूनही एकता असल्यामुळे संस्कृती, परंपरा, यामुळे संपन्नअसल्यामुळेआदर्श राष्ट्रम्हणून ओळखले जात आहे. भारतीय

सुरुवातीला आपल्या आपल्या नवनवीन तंत्रज्ञान आणि कठोर परिश्रम यांच्या सहाय्याने नक्कीच कमतरतांवर विशेष लक्ष देऊन त्यावर मात करून नक्कीच जगासमोर एक आदर्श राष्ट्र ठरेल. तसे सामाजिक विषमता

दूर करणे, महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांचे सशक्तीकरण करणे, रोजगार निर्मितीत नव्या संधी उपलब्ध करून वाढीसाठी प्रयत्न करणे, आर्थिक विषमता , शिक्षण क्षेत्रातील विषमता दूर करून त्यातील अडथळे दूर करून अधिक प्रगती करणे अशी असंख्य कार्य करण्यावर भर दिला पाहिजे.

आपला देश आता महासत्ता असलेला देश बनला आहेच. आपल्या आजूबाजूच्या राष्ट्रांकडे पाहिले की हे प्रकर्षाने जाणवते. पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, चिन यांचापेक्षा आपला देश नक्कीच सर्वार्थाने शक्तिशाली आहे.

पहेलगामच्या हल्ल्यात याची प्रचिती सर्वांनाच आली. आधीचा भारत असता तर बोटचेपेपणा करून गप्प बसून राहिला असता. पण आता यावेळी त्यांना त्यांच्याहीपेक्षा जोरदार , तसेंच तडाखेबाज प्रत्युत्तर देऊन त्यांची बोलतीच बंद केली. आपल्या सामर्थ्याची ओळख अवघ्या विश्वाला झाली. त्यामुळे कायम छोट्या मोठ्या कुरापती काढून हैराण करणारा पाकिस्तान गार झाला. फक्त एवढेच नाही तर भारताने सर्व राष्ट्रांशी खूपच आपुलकीचे, मैत्रीचे संबंध ठेवलेले असल्यामुळे पाकिस्तान सारख्या देशाना दाखवत नसले तरी आतून चांगलीच भिती वाटत आहे. पाकिस्तानची झालेली दुरावस्था पाहून मोठ्या मोठ्या डिंग्या सोडणारा बांगलादेश पण थंड झाला. आम्ही शांत राहतो याचा अर्थ आम्ही कमजोर आहोत असा नाही, वेळ आली तर ते दाखवूनही देऊ शकतो, हाच संदेश साऱ्या देशाना दिला गेला.

पंतप्रधानांना व्हिसाही नाकारलेले देश आता सन्मानाने, आदराने बोलावून घेऊन स्वागत करतात ही आपल्यासाठी अभिमानाची, गौरवाचीच गोष्ट आहे. सर्वांशी प्रेमाने जोडून आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवून दिले. इस्त्राईल-इराण युद्धाचे किती भीषण परिणाम तिथल्या लोकांना भोगावे लागत आहेत. भारताने मुत्सद्दीपणाच्या धोरणामुळे युद्ध, हानी मोठ्या प्रमाणावर टाळली.

आजूबाजूच्या सर्व देशात आपले खास समितीचे दूत पाठवून अवघ्या विश्वात आपली भूमिका स्पष्ट केली. आजूबाजूच्या राष्ट्रातही आतंकवाद नं होण्याची ग्यारेंटी देऊन आश्वस्थ केले. मुत्सद्दीपणामुळे आपली ताकदही सर्वांना जाणवलीच शिवाय युद्ध आणि त्याचे भीषण परिणाम टाळले गेले. अशाप्रकारे सर्वशक्तिनीशी

प्रयत्नपूर्वक आपला भारत देश केवळ महासत्ता नं राहता आता विश्वगुरु होण्याच्या मार्गावर ठामपणे चालत आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात आणणे आता अशा प्रयत्नामुळे फारसे कठीण नाहीच, पण फार दूरही नाही.

म्हणूनच यादिवशी सर्व नागरिकांनी याची जाणीव ठेवून केवळ एक ऐतिहासिक दिवस नं मानता केवळ देशभक्ती वरील भाषणे देणे, ध्वजारोहण करणे, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम करणे, किंवां विविध क्रीडा,कला स्पर्धा, प्रदर्शन आयोजित करणे एवढेच नं करता स्वातंत्र्यवीर, देशाच्या प्रगतीसाठी ज्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून देशासाठी, समाजासाठी, त्याच्या प्रगतीसाठी जमेल ते योगदान देण्याचा संकल्प करून खारीचा वाटा तरी उचलायलाच पाहिजे. ही प्रत्येकाची जबाबदारी आणि कर्तव्यच आहे. हेच देशाप्रती आपले खरे योगदान असेल.

# स्वत:शी समाजाशी आणि राष्ट्राशी प्रामाणिक असणे हीच खरी देशसेवा

**ज्योतिर्मय साहित्य**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. आजही २०२६ मध्ये देश स्वतंत्रच आहे. पुढील वर्षांपर्यंत देश स्वतंत्र होऊन ८० वर्षे होतील. स्वतःच्या डोळ्यांनी देशाला मिळालेले स्वातंत्र्य पाहिलेले खूपच कमी व्यक्ती आज देशामध्ये विद्यमान आहेत. आणि ते किती व्यक्त होऊ शकतात ही देखील शंका आहे कारण वयोमानानुसार इंद्रिय क्षमता कमजोर होतात.

राज तंत्रामध्ये असलेला भारत, अनेक ठिकाणी संस्थानिकांचे राज्य असलेला भारत देश, स्वतंत्र झाल्यावरही नंतर काही वर्षे ही अनेक समस्यांना झुंज देत पुढे आला. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले परंतु प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्य मिळत जायला खूप वर्षे लागली. आ. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीचे प्रमुख पद भूषवून खूप मोठ्या कष्टाने भारताची घटना, कायदा निर्माण केला. त्याच घटना व कायद्याच्या आधारे आपण संविधानाचा आदर करत अत्यंत प्रतिष्ठेचे जीवन जगत आहोत.

स्वातंत्र्य मिळाले त्या काळामध्ये देशामध्ये शिक्षण, दळणवळण, तंत्रज्ञान इत्यादी अनेक बाबतीमध्ये फार मोठे मागासलेपण होते. इतकेच पहा ना आपल्या देशामध्ये अनेक सुविधा किंवा कामाच्या गोष्टी इंग्रजांनी चालू केल्या अर्थात त्या त्यांच्या व्यवहाराच्या सुरळीकतेसाठी . मात्र असंख्य देशभक्तांच्या प्राणाच्या आहुतीच्या बदल्यात मिळालेले स्वातंत्र्य आपण पुढे काही काळ थोडे मंद गतीने विकासाकडे नेले. आणि १९७० च्या दशकानंतर देशाच्या परिस्थितीमध्ये मोठे बदल व्हायला सुरुवात झाली. शिक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान सर्वच बाबतीमध्ये देशाने अत्यंत गतीने प्रगती करायला सुरुवात केली. त्यापूर्वी देशामध्ये मूलभूत समस्याही खूप होत्या त्यामुळे फार मोठा बदल घडू शकला नव्हता.

आज या ठिकाणी हे सांगायला फार मोठा अभिमान वाटतो की अनेक क्षेत्रांमध्ये आज आपला देश जगामध्ये आघाडीवर आहे. जगामध्ये मोठ्या शक्तीच्या




स्वरूपामध्ये आपला भारत देश उभा होत आहे.इतकेच नव्हे तर स्वतःला मोठे म्हणून घेणाऱ्या जगातील बलाढ्य देशांमध्ये जो काही विकास होतो विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैद्यकीय विकास यामध्ये फार मोठा हातभार भारतीय वैज्ञानिकांचा आहे. आपल्या देशातील महत्त्वाची तरुण संशोधक बौद्धिक पिढी ची ओढ काही मोठ्या राष्ट्रांकडे आहे त्यामुळे ते उपजीविकेसाठी बाहेर देशात जाऊन करिअर करतात. परंतु त्याचा उपयोग त्या देशांना होतो.

तंत्रज्ञानामध्ये भारताला स्वतःच्या पायावर संपूर्ण जगामध्ये उभे करायचे असेल तर सर्व तंत्रज्ञान आपण आपल्या देशात विकसित केले पाहिजे. तांत्रिक बाबतीत आपले राष्ट्र इतर देशावर अवलंबून नसावे. म्हणून आपली युवा पिढीची बौद्धिक क्षमता इथेच उपयोगी यावी म्हणूनच माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्रजी मोदी यांनी मेक इन इंडिया ची उद्घोषणा करत अनेक प्रकारे नवीन पिढीला मदतीचा हात दिला. आज स्टार्टअप प्रोजेक्ट मधून अनेक युवा शास्त्रज्ञ नवीन तंत्रज्ञान आपल्या देशात विकसित करत आहेत अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

आज आपला भारत देश तंत्रज्ञान,विज्ञान, शिक्षण, अध्यात्म अशा अनेक विषयांमध्ये विकसित आहे. परंतु आज पुन्हा एक आवश्यकता आहे प्रत्येकाने नैतिकतेने स्वतःचे जीवन जगत,हृदयामध्ये देशप्रेम बाळगून देशाच्या विकासाला आणि प्रगतीला स्वतःच्या शक्तीनिशी हातभार लावणे.

प्रत्येकाने दररोजचे आपले ध्येय,काम, कर्तव्य बजावत असताना एकच गोष्ट सतत लक्षात ठेवावी की माझ्या या कृतीचा देशासाठी उपयोग आहे का? मी हे केल्यामुळे देशाचे हित आणि नाव उज्वल होणार आहे का?




आपण व्यावसायिक असो तर व्यवसायात प्रामाणिकता, आपण संशोधक असो तर केलेले संशोधन आधी देशहिताचे असावे हा विचार महत्त्वाचा आहे. अर्थातच आपण केलेल्या प्रत्येक कृतीचा राष्ट्रासाठी उपयोग हवा. कोणत्याही क्षुल्लक कृतीतून सुद्धा कदापी राष्ट्राचे अहित होऊ नये यासाठी प्रत्येकाने सतत सतर्क राहणे गरजेचे वाटते. एक भारतीय नागरिकाच्या अशा ठाम निश्चयपूर्वक विचारानेच देश जागतिक महासत्ता नक्कीच होईल.

देशसेवा म्हणजे काय? हा प्रश्न आज आपल्या मनाला विचारून पाहिला तर त्याचं काय उत्तर येईल? अर्थातच नैतिकता, प्रामाणिकता, कर्तव्यनिष्ठा. प्रत्येकाने आपले काम प्रामाणिकतेने सर्व शक्तीनिशी करत राष्ट्रनिष्ठा सतत हृदयात बाळगली तर वेगळी अशी देशसेवा करण्यासाठी कुठे जाण्याची गरज नाही. यातूनच राष्ट्रहित उज्वल होईल. आपण स्वतःशी समाजाशी आणि राष्ट्राशी प्रामाणिक असणे हीच खरी देशसेवा. असे माझे मत आहे

जय हिंद ! जय भारत !!

# स्वतंत्र भारतासमोरील आव्हाने व आम्ही भारतीय


**ज्योतिर्मय साहित्य**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे पूर्ण होऊन भारत ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहे.जगात एकमेव असे राष्ट्र आहे की,ज्याचे स्वातंत्र्य इतक्या दिवस अबाधितपणे टिकून आहे.पण खरी कसौटी येथून पुढे आहे. देशासमोर या दशकात अनेक संकटे आली, येत आहेत, व येणार आहेत,याचे भान सर्वांनी ठेऊन अत्यंत जागरूक व देशाप्रती एकनिष्ठ राहण्याची नितांत गरज आहे. भारत मातेच्या स्वातंत्र्य प्रित्यर्थ ज्या महान वीरांनी, देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे.त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे पदोपदी

स्मरण करून देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.आज देशाची सर्वच क्षेत्रात झालेली उल्लेखनीय प्रगती, विकास, उन्नती हे सर्व जगातील इतर राष्ट्रांच्या डोळ्यात खुपत आहे.देशातील व्यवस्थित घडी विस्कळीत कशी होईल यासाठी शेजारी, पाजारीचे राष्ट्र व जगातील ईतर बडे राष्ट्र छुप्या कारवाया करीत आहे. आमच्या देशातील काही नागरिकाना हाताशी धरून देशात अंतर्गत बंडाळी माजवण्याचा प्रयत्न करीत आहेत.देशाच्या सिमेवर कुरापती काढून परिस्थिती बिघडवीत आहेत.भारताची प्रगती कशी





रोखता येईल या साठी ही काही देश काड्या करीत आहेत.देशातील काही विघ्नांसंतोषी देशाचे नागरिक ही परकीयांच्या आमिषाला बळी पडून देशाशी बेईमानी करीत आहेत. त्यानी देश हिताला प्राधान्य द्यावयास हवे.देश प्रथम हे तत्व मानायला हवे .देशात जे वेगवेगळ्या क्षेत्रात घोटाळे सुरू आहेत तेही थांबविण्यासाठी सर्वांनी एकत्र यावयास हवे.आज देशातील तरुणाई मोठ्या प्रमाणात विचलित आहे.त्यांनी आपल्या मनावर व कृतीवर संयम ठेवावा. या देशाचे खरे आधारस्तंभ आजचे युवक आहेत.त्यांनी देशाच्या सक्षम बांधणीसाठी आपले ज्ञान, माहिती, बळ व कौशल्य लावावे असे वाटते. देशासमोर बेकारी,देशासमोर महागाई, देशासमोर शेजारील राष्ट्रानी काड्या करणे, अतिरेकी उपद्व्याप, देशात वाढत असलेला भ्रष्टाचार, देशातील भोंदूगिरी, आपापसात कलह,शेतकरी समस्या व प्रश्न, विकासात येणारे अडथळे, देशातीलच अधिकारी व पदाधिकारी यांची ढासळत असलेली निष्ठा, कर्तव्य अशा किती तरी समस्या आ-वासून उभ्या आहेत. या सर्वांवर मात करण्यासाठी देशभक्ती जागविण्यासाठी, हर घर तिरंगा-घर घर तिरंगा, वंदे मातरम राष्ट्रीय गीत, व विविध उपक्रमांच्या माध्यमातून देशातील नागरिकांना संघटित करून राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, कर्तव्यात प्रामाणिकता, सामाजिक समानता, एकता, व राष्ट्रप्रेम जागविण्याच्या या उपक्रमात सहभागी होऊन भारताच्या सर्वांगीण विकासात सर्वांनी सहकार्य करावे व एकसंघ




भारत टिकवावा अशी अपेक्षा.

# क्षितिज...

**ज्योतिर्मय साहित्य**



आकाशाशी जडले नाते
धरणी मातेचे..ही गदिमांची
सुंदर कल्पना! की
भाकरीचा चंद्र
शोधण्यात जिंदगी बरबाद
झाली..ही सूर्वेची
वास्तविकता...
शापित मी तागमगत्तो..
ह्या कविते प्रमाणे वेड
आकाशात भरारी घेण्याचे..
आणि घराची उबही
हवीहविशी वाटणारा !
नंतर संसारात
पडल्यावर पाडगावकरांनी
लिहिल्या प्रमाणे जवळ
पणाचे झाले बंधन अशी
स्थिती?
तर कधी केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे तू मम जीवित.. तू
मम आत्मा..''
का
घर संसार आणि आकाश
_अवकाश ही दोन टोके?
का त्यांचे होत नाही मिलन
क्षितिजा सारखे....
की
तो पण अभासा
असतो..जमीन आणि आकाश ह्यांच्या मिलनाचा...?
जसे क्षितिजा कडे जावे तसे तसे ते दूर दूर जात राहत..
आणि
कवेत कधीच घेता येत नाही.
ह्या दोन समांतर रेषा आहेत..
कधीही छेद न देणाऱ्या...!
घरातच अवकाश शोधावे की
अवकाशात घर ?
काय करावे?




# शेतकरी-देशाच्या प्रगतीचा खरा आधारस्तंभ

**ज्योतिर्मय साहित्य**

१५ ऑगस्ट हा आपल्या भारताचा अमृतकाळातला स्वातंत्र्यदिन. हा दिवस केवळ तिरंगा फडकावण्याचा आणि राष्ट्रगीत म्हणण्याचा नाही, तर देशाच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाचे आभार मानण्याचा दिवस आहे. भारताच्या प्रगतीची चर्चा करताना ज्या एका घटकाचा चेहरा डोळ्यांसमोर सर्वात आधी येतो, तो म्हणजे आपला 'शेतकरी'. ''जय जवान, जय किसान'' आणि ''जय विज्ञान, जय अनुसंधान'' या घोषणांमधून देशाने नेहमीच शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आज भारताने जागतिक पातळीवर महासत्ता बनण्याच्या दिशेने जी झेप घेतली आहे, तिचा खरा पाया आपल्या शेतात आणि मातीत घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याने रचला आहे.

शेतकरी आणि भारताची प्रगती या विषय समजून घेऊ.

स्वातंत्र्योत्तर काळ आणि कृषी क्षेत्राची पायाभरणी

१९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा देशासमोर अन्नधान्याची मोठी टंचाई होती. आपण धान्यासाठी इतर देशांवर अवलंबून होतो. अशा कठीण परिस्थितीत भारतीय शेतकऱ्याने कंबर कसली. १९६० च्या दशकात आलेल्या हरितक्रांतीने देशाचे चित्र बदलले. उन्नत बियाणे, रासायनिक खते आणि सिंचनाच्या सोयींमुळे भारताने अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबन मिळवले. ज्या देशाकडे एकेकाळी स्वतःचे पोट भरण्याचे साधन नव्हते, तो भारत आज जगातील अनेक देशांना अन्नधान्य निर्यात करत आहे. हा चमत्कार केवळ आणि केवळ शेतकऱ्यांच्या अथांग कष्टामुळे शक्य झाला.

भारतीय अर्थव्यवस्थेचा तो मुख्य कणा आहे.

भारत हा आजही कृषीप्रधान देश आहे. देशाची जवळपास निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर उपजीविका करते. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात () कृषी क्षेत्राचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. जेव्हा देशात चांगला पाऊस होतो आणि शेतीचे उत्पन्न वाढते, तेव्हा बाजारपेठेत तेजी येते. उद्योगधंद्यांना कच्चा माल शेतीतूनच मिळतो. सुती कापड उद्योग, साखर कारखाने, अन्न प्रक्रिया उद्योग हे पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहेत. म्हणजेच, देशाच्या आर्थिक प्रगतीचे चक्र शेतीच्या प्रगतीवरच फिरते.

तंत्रज्ञानाची जोड आणि आधुनिक शेती

आजचा भारत हा डिजिटल आणि हायटेक भारत आहे. या प्रगतीपासून आपला शेतकरीही मागे



राहिलेला नाही. आजचा तरुण शेतकरी पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहे:

ठिबक आणि तुषार सिंचन: पाण्याचा अपव्यय टाळून कमी पाण्यात जास्त उत्पादन घेतले जात आहे.

ड्रोन तंत्रज्ञान: पिकांवर औषध फवारणीसाठी आणि शेताच्या देखरेखीसाठी ड्रोनचा वापर वाढला आहे.

पॉलीहाऊस आणि ग्रीनहाऊस: हवामानातील बदलांचा फटका बसू नये म्हणून नियंत्रित वातावरणात भाजीपाला आणि फुलांची शेती केली जात आहे.

डिजिटल प्लॅटफॉर्म: शेतकरी आता मोबाईल ॲप्सद्वारे हवामानाचा अंदाज, बाजारातील भाव आणि पिकांवरील रोगांची माहिती एका क्लिकवर मिळवत आहेत.

आव्हानांचा सामना करणारा अन्नदाता

भारताने प्रगती केली असली, तरी शेतकऱ्यांच्यासमोरील आव्हाने अजूनही संपलेली नाहीत. उलट हवामान बदलामुळे ही आव्हाने अधिक बिकट झाली आहेत. कधी ओला दुष्काळ, तर कधी सुका दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जातो. याशिवाय, बाजारातील भावाची अनिश्चितता, साठवणुकीच्या सोयींचा अभाव आणि वाढता उत्पादन खर्च यांमुळे शेतकरी आजही आर्थिक विवंचनेत सापडतो. देशाच्या प्रगतीचा खरा आनंद तेव्हाच मिळेल, जेव्हा या आव्हानांवर कायमस्वरूपी तोडगा निघेल.

सरकारी योजना आणि प्रगतीचे पाऊल-

शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य देण्यासाठी आणि शेती फायदेशीर करण्यासाठी शासन पातळीवर विविध प्रयत्न केले जात आहेत.

पीएम किसान सन्मान निधी- शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देऊन पेरणीच्या काळात हातभार लावला जातो.

पीक विमा योजना- नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे आर्थिक रक्षण केले जाते.

कृषी स्टार्टअप्स: आज शेकडो तरुण कृषी क्षेत्रात नवनवीन स्टार्टअप्स सुरू करून शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे मध्यस्थांची (दलालांची) साखळी तुटण्यास मदत होत आहे.

स्वातंत्र्यदिनी संकल्प: शेतकऱ्यांचे सक्षमीकरण हीच देशाची प्रगती




१५ ऑगस्टला जेव्हा आपण स्वातंत्र्याचा सोहळा साजरा करतो, तेव्हा आपण हे विसरता कामा नये की, सीमेवर रक्षण करणारा जवान जितका महत्त्वाचा आहे, तितकाच देशाची भूक भागवणारा शेतकरीही महत्त्वाचा आहे. भारताला जर ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनायचे असेल, तर कृषी क्षेत्राचा विकास दुप्पट वेगाने करावा लागेल.

शेतकऱ्याला केवळ अन्नदाता म्हणून गौरवण्यापेक्षा त्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. त्याला त्याच्या पिकाला योग्य भाव मिळायला हवा, सिंचनाच्या शाश्वत सुविधा मिळायला हव्या आणि शेतीपूरक व्यवसायांना (उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन) चालना मिळायला हवी.

थोडक्यात सांगायचे तर, भारताची प्रगती आणि शेतीचा विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जोपर्यंत देशाचा शेतकरी समृद्ध होत नाही, तोपर्यंत भारत पूर्णपणे विकसित देश बनू शकत नाही. या स्वातंत्र्यदिनी आपण सर्वांनी मिळून संकल्प करूया की, शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, कृषी उत्पादनांचा आदर करू आणि देशाच्या प्रगतीमध्ये आपल्या मातीचे ऋण कधीही विसरणार नाही.

भारतीय शेतीचा,शेतकऱ्यांचा विजय असो, भारतीय शेतकऱ्याचा विजय असो !

जय हिंद! जय किसान !

# नांदी संमेलनाची वारी ; आपल्या गावी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुण्यात होणा–या शतकमहोत्सवी साहित्य संमेलन निमित्ताने देशभरात ९९ ठिकाणी नांदी साहित्य संमेलन हा उपक्रम मसाप,पुणे यांनी आयोजित केला आहे.यातील पहिले संमेलन पुण्यात स्वातंत्र्यदिन पूर्वसंध्येला हिराबागेत आयोजित करण्यात आले होते तर अंतिम संमेलन औदुंबर येथे दि.१५ जानेवारी २०२७ रोजी होणार आहे.(संमेलनाचा मुख्य समारंभ दि.२८ ते ३१ जानेवारी दरम्यान पुणे विद्यापीठात होणार आहे),मध्यंतरीच्या सहा महिन्यांत महाराष्ट्र किंवा महाराष्ट्राबाहेर जिथे कुठे संमेलन पूर्वी भरले होते,तिथे ही नांदी संमेलनं होणार आहेत.पुणे मसाप आणि स्थानिक आयोजक यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन आहे; या संदर्भात साहित्य परिषद पदाधिकारी व आयोजक यांची कार्यशाळा पुणे विद्यापीठात मागच्या महिन्यात दि.२६ रोजी होवून गेली.**

प्रतिवर्षी येणा–या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अप्रूप व उत्सूकता महाराष्ट्रासह बहुभाषिकांनाही असते,त्यात संमेलनाचे शताब्दी वर्ष म्हटल्यावर या वाटणा–या अप्रुपात आणखी भर पडणार.


सातारा येथील ९९व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ.मिलिंद जोशी यांनी शंभरावे साहित्य संमेलन हे पुण्यात होणार,याची घोषणाच करून टाकली;

(एवढ्या लवकर घोषणा का केली गेली याचाही अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला);तेव्हापासून खरे तर सगळे चक्र बदलले, पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले,दरम्यान साहित्य परिषदेच्या निवडणूका घोषित झाला, गाजल्या आणि वाजल्या. निवडणुकीच्या या रणसंग्रामात महामंडाळाचे अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह कोषाध्यक्ष हे प्रमुख पदाधिकारी खर्ची पडले,तर फक्त जोशी गटाचे चार उमेदवार कसे–बसे निवडून आले.तर रंगकर्मी योगेश सोमण यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळवत प्रतिस्पर्धी जोशी गटावर मात केली. जोशीबुवांच्या पराभवाने शताब्दी संमेलन आयोजन करण्याची हाती आलेली संधी हिरावली गेली.शेवटी परभवाचा कुणी वाली नसतो.यथावकाश सोमण साहित्य परिषदेचे व महामंडळाचे अध्यक्ष झाले.हारतुरे सत्कारात न रमता नवीन कार्यकारिणी लागोलाग कामाला लागले, साहित्य पत्रिका या मसापच्या मुखपत्रास संपादक मिळाले.नव्या कार्यकारिणी समोर सर्वात पहिले आव्हान आहे ते शताब्दी संमेलन आयोजनाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडणे.

एक मात्र खरे की समारोप सत्रातील घोषणेपासूनच साहित्य क्षेत्रात नवीन वातावरण निर्मिती सुरू झाली.

संमेलनाचे स्थळ आधीच निश्चित झाल्याने स्थळ पाहणी हा सोपस्कार होता,तोही पार पडला. पुण्यातील शताब्दी संमेलनास सह आयोजक म्हणून अनेक जुन्या संस्थाची नावे चर्चेत होती,पण त्यातल्या त्यात संमेलनाचे स्थळ म्हणून पुणे विद्यापीठाची सर्वसंमतीने निवड करण्यात आली.‘‘ पुणे तिथे काय उणे ‘‘,या बहू चर्चित वाक्याची प्रचिती आता संमेलनाच्या नांदी पासून ते सुप वाजण्यापर्यंत साहित्य रसिकांना येतच राहणार आहे.एकदिवशीय साधा कार्यक्रम असला तरी पुणेकर आयोजनात व्यवस्थित नियोजन करतात, गृहपाठ करतात आणि उत्तम तयारी करतात;आता शंभरावे संमेलन म्हटल्यावर कच्चा गृहपाठ असायलाच नको.याचाच तयारीचा भाग म्हणून शताब्दी संमेलन आयोजनाच्या तयारीसाठी मसाप पदाधिकारी,व इच्छुक कार्यकर्ते यांची कार्यशाळा जुलै महिन्याच्या २६ तारखेला संपन्न झाली.यासाठी राज्यभरातील २०० निमंत्रित साहित्यिक/कार्यकर्ते हजर होते.नमनालाच भरघोस प्रतिसाद मिळत असणे म्हणजे संमेलन यशस्वी होण्यासाठी ही सकारात्मक सुरूवात समजली पाहिजे.पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ सुरेश गोसावी,प्र.कुलगुरू डॉ.पराग काळकर,पुणे महोत्सवाचे मुख्य आयोजक राजेश पांडे, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, सुनील महाजन ,आशूतोष जावडेकर,अंजली कुलकर्णी व मसापचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेतील महत्वाची बातमी म्हणजे शताब्दी संमेलन निमित्ताने ९९ संमेलन देशभरात निवडक ठिकाणी होणार आहे,यात आधी जिथे संमेलन झाले तिथल्या गावांचाही समावेश असणार आहे.





या, संदर्भात महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी सांगितले – ‘‘ नांदी संमेलनातील पहिले संमेलन पुण्यातील हिराबागेत दि.१४ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आले होते,यात १०० वर्ष पूर्ण केलेले ज्येष्ठ हास्य चित्रकार शि.द.फडणीस व ज्येष्ठ व्याकरण तज्ञ यास्मिन शेख यांच्यासह जुन्या संस्थाचा सत्कार झाला;तर ९९वे संमेलन दि.१५ जानेवारी २०२७ रोजी औदुंबर येथे होणार आहे.‘‘मधल्या काळात नांदी संमेलनाच्या स्थळा संदर्भात मसापकडे नियोजन असेलच.

म्हणजे आगामी सहा महिन्यात संमेलनाची वारी आपल्या गावी येणार आहे.महाराष्ट्र साहित्य परिषद आणि स्थानिक साहित्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ही ९९ नांदी संमेलन होणार आहेत.साहित्य क्षेत्रासाठी असो की लेखकांसाठी असो,ही घटनाच मुळात लक्षवेधी आहे.

संमेलनाचे स्थळ ठरले की अध्यक्ष कोण,ही चर्चा ही होणारच. जेव्हा निवडणूक होती,तेव्हाचे वातावरण साहित्य क्षेत्राने एक काळ अनुभवले.यवतमाळच्या साहित्य संमेलनापासून अध्यक्ष निवडणूकीतून निवडण्या ऐवजी महामंडळाचे १९ पदाधिकारी सर्वसंमतीने ठरवू लागले आहेत.शंभराव्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष कोण हे ठरवायला दोन महिने बाकी आहेत, गोव्यात होणा–या साहित्य महामंडळाच्या बैठकीतच ते ठरेल.एक मात्र खरे अध्यक्षपदाची मोर्चे बांधणी ही सुरू झालेली आहे.

अध्यक्षपदासाठी चर्चेत असलेली प्रमुख नावे म्हणजे प्रख्यात विचारवंत डॉ.शेषराव मोरे, लोकप्रिय अनुवादक, लेखिका उमाताई कुलकर्णी, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील, ललित लेखक प्रवीण दवणे या शिवाय आगामी काही दिवसात यात नवीन नावांची भर पडलेली दिसेल.

त्या मुळे तमाम साहित्य रसिकांना आता या नांदी संमेलनासह शताब्दी संमेलनाविषयीही अप्रूप असेल, उत्सुकता असेल, यात शंकाच नाही.

# भिरभिरणारी फुलपाखरे आणि तो सूर्य..

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



नुकत्याच उगवलेल्या पिकांच्या
पानावर पावसाचा तो
थेंब अलगद विसवावा.
सायंकाळच्या त्या थकल्या
स्थिर कोवळया किरणांचा
सोनेरी किरण खुबीने
त्यावर चमकताना दिसावा.
भारतभूमीची शान, मान
असलेला तिरंगा त्या बिंदूत
सामावून फडकतानादिसावा.
याच्यापेक्षा नयनरम्य, असा
सोहळा इवल्याशा बुबळावर
विसावताना हसवा.
कणाकणात, मनामनात तिरंगा
याच्यापेक्षा अभिमान तो काय असावा.

घराच्या वरच्या स्लॅब वरील गॅलरीत सहज उभी होते, पाऊस नुकताच पडून गेला होता. आणि ढगांच्या आडून डोकावणारे ऊन अर्थात श्रावण महिन्यातील वातावरण अगदी कसे स्वच्छ नितळ मनाला मोहविणारे आणि बाजूच्या शेतातील गवत वारे आले डोलत होते.आणि अशाच तृणपात्यावर विसावलेल ते दैवरं आणि त्या थेंबामध्ये दिसणारी तिरंग्याची ती प्रतिमा अगदी कणाकणात तिरंगा मनामनात तिरंगा अशी अवस्था झाली. हळूवार ओंजळीत धरावा वाटणारा तो क्षण आणि अशा त्या भारलेल्या क्षणी डौलाने फडकणाऱ्या तिरंग्याच्या सावलीकडे सहज लक्ष गेले. नि अभिमानाने नजर आकाशाकडे वळली.
नजरेत ती चमक चमकत असतानाच, पक्षांचा एक थवा मुक्त विहारत पश्चिमेकडून पूर्व दिशेला गेला. आणि त्याचे सावट एका क्षणासाठी तिरंग्यावर पडले. आणि..,





तो एक क्षण माहित नाही का? पण जीवाला चटका लागून गेला. स्वातंत्र्याची एकोणांशी वर्ष आपण पूर्ण करतो आहोत.

कल्पना विलासातली एक ज्योत अखंड तेवतेय, असा एका क्षणासाठी भास झाला. आणि नारंगी रंग आणखीच उठून दिसू लागला. जणू खवळलेल्या लाल रक्तासारखा, आणि त्यामध्ये आठवणारे भगतसिंग, राजगुरुसारखे देश स्वातंत्र्याच्या लढ्यातील ते हुतात्मे आणि असे अनेक खाकी कपड्यातील अनेकविध चेहरे, दोन भुवया मधले ते ठसठसित कुंकू, नाजूक हाताने मनगटावर बांधलेला सोन्यापरी चकाचकणारा तो सोनेरी धागा.. आणि युद्धभूमीवर सांडलेलं रक्त .. नकळत डोळ्यातले ते दोन थेंब ओघळून जमिनीवर पडले... आणि..! नकळत डोळे ओले करून गेले.

मधला पांढरा रंग, शांत शुभ्र, सत्याचा सारे काही लकलकीत जणू ॐ कार स्वरुपच सत्य पावित्र्याचा असा हा रंग शांतीतून सत्याच्या आणि सत्यातून पावित्र्याच्या मार्गावर दूरवर गेलेला तो रस्ता तर दिसत होता. पण त्यावरुन चालणारी पाऊले थोडी अस्पष्ट दिसत होती. संधी कालाकडे झुकलेली दूरवर विसावणाऱ्या त्या ऊन सावलीची किरणे अशोक चक्रातील आऱ्यांवर पडून शांती, सत्य, कर्तव्य, नैतिक जबाबदारी, त्याग, सेवा, प्रेम, या साऱ्यातून संघटन करुन, २४ तासाच्या काळाच्या गतीने फिरत असल्याचा भास होत होता. काही आऱ्यांवर किरणे पडून चमकत होती.नी काही ...?

डोलणारी ती पिके, हिरवीगार झाडे, हिरवाईने नटलेला सौंदर्यवान भारताची प्रतिमा, जणू समृद्धीचेच प्रतिक हिरव्या रंगाच्या त्या पट्ट्यात दिसत होती. पण माहित नाही का? ती हिरवीगार पीके झाडे डोलताना त्यांच्यात कसलीशी उणीव जाणवत होती. मावळतीकडे झुकलेला तो सूर्य आणि तिरंग्यात अदृश्य रुपाने जाणवणारी ती ज्योत अंधाराचा ठाव घेवून प्रकाशाकडे वाट तर दाखवतच होती, पण कसल्याशा उणीवेनं मनाची झालेली घालमेल झाली.

कळतय पण समजत नाही. अशी अवस्था मनाला उदविग्न करत होती. कोणावर रोष नाही,काय चूक काय बरोबर याच्यापेक्षा कुठे काय चुकतयं ती चूक शोधायला हवीय का?... असा प्रश्न निर्माण करून गेली.

सर्वसमावेशकतेचा मार्ग अंगिकिरायला हवाय का?

हिरवाईच्या त्या सुंदर हिरवाईतून एक फुल उमलू पाहतयं आणि त्यावर भिरभिरणारी रंगीबिरंगी फ ुलपाखरे स्वच्छंद बागडताहेत असं एक सुंदर स्वप्न डोळ्यासमोर तरळलं, किती छान ना! हे सारं दृश्य पाहता पाहता टेबलावर पडलेला पेन आणि त्या पेनातल्या शाई उगाचचं बाहेर पडू पहात होती आणि मग नकळत .... उमटणारी ती एक एक अक्षरे शताब्दीच्या महोस्तवाकडे आणि त्या स्वच्छंद भिरभिरणाऱ्या फुलपाखरांपरी भिरभिरावी.

हि नैतिक जबाबदारी कुणा एकाची नसून आपल्या सर्वांची असावी. सूर्य मावळतीकडे जरी झुकलेला असलेला तरी उद्या नव्या किरणा सह पुन्हा नव्याने उगवणारच आहे.. आणि त्या नव्या किरणात नवी चमक घेऊन येईल आणि उद्या पुन्हा नव्याने ती फुलपाखरे.... या आशेसह ... जय हिंद, जय महाराष्ट्र...! जय भारत....!

# तिरंगा उंच आहेपण आपल्या लेकरांच्या स्वप्नांचे काय?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



१५ ऑगस्ट भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस! आकाशात डौलाने फडकणारा तिरंगा, ओठांवर राष्ट्रगीत, हातात झेंडा आणि मनात देशभक्तीचा अभिमान. हा दिवस प्रत्येक भारतीयाच्या हृदयात नवचैतन्य निर्माण करणारा. स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करण्याचा आणि देशाच्या भवितव्याची दिशा ठरवण्याचा हा दिवस. मात्र, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना एक प्रश्न मनाला अस्वस्थ करतो. ज्या भारतासाठी शहीदांनी रक्त सांडले, त्या भारतातील प्रत्येक तरुणाला न्याय, संधी आणि सुरक्षित भविष्य मिळते आहे का? देशाच्या सीमेवर उभा असलेला सैनिक गोठवणाऱ्या थंडीत, प्रखर उन्हात आणि मृत्यूच्या सावलीत देशाचे रक्षण करतो. कारगिलच्या रणभूमीवर आपल्या मातीसाठी लढताना अनेक जवानांनी हसत हसत मृत्यूला कवटाळले. त्यांच्या छातीवर लागलेल्या गोळ्या केवळ त्यांच्या शरीराला भेदून गेल्या नाहीत, तर त्या प्रत्येक भारतीयाच्या हृदयात कायमच्या कोरल्या गेल्या. कॅप्टन विक्रम बत्रा, लेफ्टनंट मनोज कुमार पांडे, ग्रेनेडियर योगेंद्रसिंह यादव यांच्यासह कारगिलच्या रणांगणात शौर्याची गाथा लिहिणाऱ्या प्रत्येक वीराला या स्वातंत्र्यदिनी कोटी कोटी नमन! पण आज देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या त्यागाबरोबरच देशाच्या भवितव्याचे रक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वेदनेकडेही आपण पाहिले पाहिजे.

नीटसारख्या महत्त्वाच्या परीक्षांमध्ये पेपरफ ुटी, अनियमितता आणि व्यवस्थेवरील प्रश्नांनी देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या मनात असुरक्षितता निर्माण झाली. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न डोळ्यांत घेऊन वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका नसते, तर ती त्यांच्या आयुष्याची दिशा असते. आई–वडिलांची मेहनत, कुटुंबाच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांचे दिवस–रात्र केलेले कष्ट आणि भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न, हे सगळे त्या एका परीक्षेशी जोडलेले असते. अशावेळी परीक्षेच्या व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले, तर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? काही विद्यार्थ्यांनी या कथित गैरप्रकारांमुळे आणि परीक्षेच्या तणावामुळे आपले जीवन संपवले, ही बाब कोणत्याही संवेदनशील समाजाला हादरवून सोडणारी आहे. एका विद्यार्थ्याचा मृत्यू म्हणजे केवळ एका कुटुंबाचा अंत नसतो तर तो देशाच्या भविष्यातील एका शक्यतेचा अंत असतो. त्या घरातील आईच्या डोळ्यांतील अश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावरील पोकळी आणि भावंडांच्या मनातील कायमची जखम कोणतीही भरपाई भरून काढू शकत नाही. आज स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आपण तिरंग्याला सलाम करतो. पण त्या तिरंग्याला खरी मानवंदना तेव्हाच मिळेल, जेव्हा या देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या कष्टावर विश्वास ठेवता येईल. मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्याचा पराभव पेपरफुटीने होणार नाही आणि प्रामाणिकपणाची किंमत भ्रष्ट व्यवस्थेपेक्षा कमी असणार नाही, अशी व्यवस्था उभी करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे. कारगिलमध्ये सैनिकांनी शत्रूशी लढा दिला. आजच्या भारतात तरुणाई एका वेगळ्या संघर्षाला सामोरी जात आहे. स्पर्धेचा, बेरोजगारीचा, परीक्षेच्या तणावाचा आणि व्यवस्थेवरील कमी होत चाललेल्या विश्वासाचा. सीमेवरचा जवान देशाच्या भूभागाचे रक्षण करतो; तर विद्यार्थी देशाच्या भविष्याचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे शहीद जवानांच्या बलिदानाइतकीच विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचीही किंमत आपण ओळखली पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे भीतीपासून मुक्ती. अन्यायापासून मुक्ती. भ्रष्टाचारापासून मुक्ती. भेदभावापासून मुक्ती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपल्या कष्टाचे फळ आपल्याला मिळेल, या विश्वासाने जगण्याचे स्वातंत्र्य!

**प्रविण बागडे**
नागपूर

आज देशातील लाखो पालक आपल्या मुलांना मोठे करण्यासाठी आयुष्याची पुंजी खर्च करतात. शेतकरी आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे म्हणून कर्ज काढतो. कामगाराचा मुलगा इंजिनिअर व्हावा म्हणून आई–वडील स्वतःच्या गरजा बाजूला ठेवतात. सामान्य कुटुंबातील मुलगा–मुलगी मोठ्या स्वप्नांसाठी दिवस–रात्र अभ्यास करतात. पण जर या स्वप्नांच्या मार्गात पेपरफुटी, गैरव्यवस्था आणि भ्रष्टाचार उभा राहिला, तर हा केवळ विद्यार्थ्यांवरील अन्याय नाही, तर हा देशाच्या भविष्यावरचा आघात आहे. म्हणूनच या स्वातंत्र्यदिनी सरकारने आणि संबंधित यंत्रणांनी केवळ औपचारिक शुभेच्छा देऊन थांबू नये. परीक्षा व्यवस्थेत पूर्ण पारदर्शकता, कठोर जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी ही राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. दोषी कोणीही असो, त्याची चौकशी निष्पक्षपणे झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे मिळाली पाहिजेत. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, भविष्यात कोणत्याही विद्यार्थ्याला आपल्या मेहनतीवर संशय घेण्याची वेळ येता कामा नये.

१५ ऑगस्टला आपण ‘वंदे मातरम्’ म्हणतो, ‘भारत माता की जय’ म्हणतो. पण भारतमातेची खरी जय तेव्हा होईल, जेव्हा तिच्या लेकरांच्या डोळ्यांत भीतीऐवजी स्वप्ने असतील. जेव्हा शेतकऱ्याच्या मुलाला शिक्षणाची समान संधी मिळेल. जेव्हा गरीब आणि श्रीमंत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला समान न्याय मिळेल. जेव्हा परीक्षेतील प्रश्नपत्रिका सुरक्षित असेल आणि विद्यार्थ्यांचे भविष्यही सुरक्षित असेल. कारगिलच्या शहीदांनी आपल्या रक्ताने तिरंग्याची शान उंचावली. आजच्या पिढीने त्या तिरंग्याची प्रतिष्ठा न्याय, प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलतेने जपली पाहिजे. सीमेवर शहीद झालेल्या जवानांना आपण सलाम करतो, पण परीक्षेच्या तणावात, व्यवस्थेच्या अन्यायात आणि अपयशाच्या काळोखात हरवलेल्या विद्यार्थ्यांच्या वेदनांनाही आपण विसरता कामा नये.

या स्वातंत्र्यदिनी चला, एक संकल्प करूया देशभक्ती केवळ घोषणा आणि ध्वजारोहणापुरती मर्यादित ठेवणार नाही. सैनिकाच्या त्यागाचा सन्मान करू, शेतकऱ्याच्या कष्टाचा आदर करू, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचे रक्षण करू आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवू. कारण तिरंगा केवळ आकाशात फडकत नसतो तर तो प्रत्येक भारतीयाच्या स्वाभिमानात फडकत असतो आणि त्या तिरंग्याची शपथ घेऊन आपण एवढेच म्हणूया. ‘‘ज्यांनी सीमांचे रक्षण करत प्राण दिले, त्यांना विसरणार नाही. ज्यांनी शिक्षणाच्या स्वप्नासाठी आयुष्य पणाला लावले, त्यांना एकटे सोडणार नाही आणि ज्या भारतासाठी शहीदांनी रक्त सांडले, त्या भारतात न्याय, समानता आणि प्रामाणिकपणाचा तिरंगा सदैव उंच ठेवू!’’ कारगिलच्या वीर शहीदांना विनम्र अभिवादन! नीटसह विविध परीक्षांतील कथित गैरप्रकारांमुळे आणि तणावामुळे जीव गमावलेल्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! तसेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या प्रत्येक ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यवीराला कोटी कोटी नमन!

जय हिंद!वंदे मातरम्!